CMYK

LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय
प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही., ५०% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.९२ व ९३ सारडा सेंट्रल, डि.पी. रोड, बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३५ वे अंक ३३३ वा फोन २३०१०१ दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ शुक्रवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

# मनोज जरांगे पाटलांच्या हत्येचा कट उघड, दोघांना पकडले
# पाटील म्हणाले, पुरावे व रेकॉर्डींग ऐकल्यानंतरच लक्षात येईल

बीड दि.६ (प्रतिनिधी):– मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी जालना पोलिसांनी बीड जिल्ह्यातून दोघांना ताब्यात घेतले आहे. दरम्यान माझ्या खुनाचा कट रचला गेला हे सत्य आहे. कट शिजला गेला या संदर्भात पोलीस अधीक्षक स्वत: लक्ष घालून आहेत. तपासात दूध का दूध, पाणी का पाणी होईल. हा हत्येचा कट आणि षडयंत्र एका मोठ्या व्यक्तिने रचले आहे हे नाकारता येणार नाही, त्या संदर्भातील पुरावे व रेकॉर्डींग ऐकल्यानंतरच लक्षात येईल, यावर आपण आज शुक्रवारी सकाळी ११ वाजता माध्यमांशी बोलू असे मनोज जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले आहे. जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट उघड झाल्याचे समोर येताच सोशल मीडियातून प्रचंड संताप व्यक्त होऊ लागला आहे.

पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार जरांगे पाटलांच्या हत्येसाठी अडीच कोटी रुपयांची सुपारी देण्यात आली होती. या प्रकरणी जालना पोलीस अधीक्षकांना जरांगे पाटलांचे सहकारी गंगाधर काळकुटे यांनी तक्रार दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने तातडीने कारवाई केली. या प्रकरणात बीड जिल्ह्यातून दादा गरुड आणि अमोल खुणे या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यापैकी अमोल खुणे हा जरांगे पाटील यांचाच पुर्वीचा सहकारी असल्याचे समोर आले असून दोघांचीही पोलिसांकडून कसून चौकशी सुरु आहे. बीड शहरात काही दिवसांपुर्वी जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचण्यासाठी गुप्त बैठकाही घेण्यात आल्या होत्या. या बैठकीत जरांगे पान २ वर



## तू खूप चुकीच्या ठिकाणी हात घातलास –जरांगे पाटील

मनोज जरांगे पाटील यांनी ज्याने कट रचला त्याला इशारा दिला आहे. पाटील म्हणाले, बाळ तुला सांगतो तू खूप चुकीच्या ठिकाणी हात घातलास, असे आम्ही खूप बघितले आहेत, तू खूप चुकीचे पाऊल उचलले आहे. ज्यांनी कट रचला त्यांना मी इशारा देत आहे आम्ही मराठे आहोत एवढे लक्षात ठेवावे. मी खंबीर आहे, मराठा बांधवांना मी विनंती करतो की तुम्ही शांत रहा, असे आवाहन जरांगे पाटील यांनी केले.

## खा.बजरंग सोनवणे, आ.सोळंके, आ.क्षीरसागर, आ.पंडितांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट उघडकीस आल्यानंतर या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवरुन चौकशी करावी, कट रचणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि एसआयटी मार्फत तपास करावा यासह जरांगे पाटील यांच्या सुरक्षेत वाढ करावी अशा मागणीचे पत्र बीड जिल्ह्याचे खा.बजरंग सोनवणे, आ.प्रकाश सोळंके, आ.संदीप क्षीरसागर, आ.विजयसिंह पंडित यांनी मुख्यमंत्र्यांना पाठविले आहे.

## आज मठाधिपती पाटंगणकरांचे लळीताचे कीर्तनाने महोत्सवाची सांगता


बीड दि.७ (प्रतिनिधी):- जीव आणि परमात्मा एकत्र होणे, जसे मंदिरावर कळस किंवा पूर्णाहूतीने यज्ञाची समाप्ती तसे उत्सवाच्या पूर्णत्वाचे कीर्तन म्हणजे काला



,यात दही आणि दही एकत्र करणे असते, म्हणजे दही परमात्म्याचे आणि लाही जीवाचे प्रतीक आहे ,तर लळीताचे कीर्तन म्हणजे एक प्रकारचे भक्ती नाट्य आहे जे उत्सवाच्या शेवटी सादर केले जाते. आज दरवर्षीच्या परंपरे प्रमाणेच आचार्य श्रीअमृताश्रम स्वामी महाराज यांचे काल्याचे किर्तन पाटंगणावर संपन्न झाले, यात कृष्ण लीला सांगताना बाळ कृष्णाच्या लीला पासून, गोपाल कृष्णभगवंताचे चरित्र कथन आणि सवंगड्या सोबतच्या शिदोरीचा केलेला काला, हा प्रसाद केवळ व पान २ वर

# दादा, तुम्ही कार्यकर्त्यांनाच शहाणपण शिकविता, पण तुमच्याच पोराने काय दिवे लावले ते पहा

## १८०० कोटींची जमीन ३०० कोटीला घेतली; रजिस्ट्रीसाठी ५०० रुपये फीस भरली



बीड दि.६ (प्रतिनिधी):– राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आपल्या तडक फडक बोलण्यावरुन परिचीत आहेत. प्रत्येक वेळी कार्यकर्त्यांनो असं नका करु, तसं नका करु असे म्हणत शहाणपण शिकवितात. भ्रष्टाचार, गुंडगिरी खपवून घेणार नाही अशी तंबी प्रत्येक दौऱ्यात देतात, मात्र आज तुमच्याच पोराने काय दिवा लावलाय ते ही पहा. १८०० कोटींची जमीन ३०० कोटी रुपयांना घेतली. त्यातही त्याच्या रजिस्ट्रीसाठी कोट्यावधी रुपयांची स्टॅम्प ड्युटी लागत असतांना रजिस्ट्रीसाठी अवघ्या ५०० रुपयांची फीस भरली. चणे, फुटाणे खरेदी करावेत त्या पद्धतीने तुमच्या पोराने कोट्यावधींची जमीन खरेदी केली, आता कुठे गेली ती नैतिकता? आणि नियमावर बोट ठेवणारे अजितदादा? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.



### नेमके प्रकरण काय?

कोरेगाव पार्क परिसरातील ही जमीन वर्षानुवर्षे सरकारी मालकीची आणि उच्च बाजारमूल्याची म्हणून ओळखली जाते. मिळालेल्या माहितीनुसार, या जमिनीचे बाजारमूल्य सुमारे १८०० कोटी रुपये इतके होते. मात्र, पार्थ पवार यांच्या 'अमीडिया होल्डिंग्स एलएलपी' या कंपनीने ही जमीन केवळ ३०० कोटी रुपयांत खरेदी केल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. यातील सर्वात गंभीर बाब म्हणजे, जमीन खरेदी नोंदणीसाठी साधारणतः २५ कोटी रुपयांची स्टॅम्प ड्युटी भरावी पान २ वर

### फडणवीस साहेब, चौकशी कसली लावतायं? आधी त्या व्यवहाराला स्टे द्या

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पार्थ पवार यांनी खरेदी केलेल्या जमीन प्रकरणात ॲक्शन मोडची भूमिका घेतली आहे. या प्रकरणात त्यांनी चौकशी समिती स्थापन केली आहे. पण फडणवीस साहेब असल्या ५० चौकशी समित्या नेमल्या तरी काहीच होणार नाही हे जगजाहीर आहे. चौकशी समिती नेमून त्याचा अहवाल यायची वाट पाहण्यापेक्षा आधी त्या जमिनीच्या व्यवहाराला स्टे द्या. त्यानंतरच तुम्हाला काय चौकशी करायची ते करा, पण दोषी असेल तर कारवाई देखील व्हायलाच पाहिजे. एवढा मोठा व्यवहार झाला हे अजितदादांना सुद्धा माहित असावे त्यामुळे आताच लक्ष घाला आणि काय ते खरं खोटं महाराष्ट्रातील जनतेसमोर आणा अन्यथा असेच घोटाळे होत राहिल्यास अजितदादा भाजपाला घेऊन बुडणार असे दिसते.



#### दोन अधिकाऱ्यांचे निलंबन, चौकशी समितीची स्थापना

पुण्यातील जैन बोर्डिंग जमीन व्यवहारानंतर आता आणखी एका मोठ्या सरकारी जमीन व्यवहाराचे प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांचे नाव समोर आले असून सुमारे १८०० कोटींची जमीन केवळ ३०० कोटींमध्ये खरेदी केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या व्यवहाराची माहिती समोर आल्यानंतर राज्य प्रशासनाने तात्काळ कारवाई करत पुणे तहसीलदार सूर्यकांत येवले आणि उपनिबंधक रवींद्र तारू यांना निलंबित केले आहे.तसेच, या प्रकरणाच्या तपासासाठी अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षते खाली उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. या घडामोडीनंतर पार्थ पवार आणि अजित पवार यांच्यावर विरोधकांकडून तीव्र टीका सुरू झाली आहे.

#### मुख्य संशयाचा मुद्दा

जमीन खरेदी नोंदवल्यानंतर फक्त दोन दिवसांतच स्टॅम्प ड्युटी माफ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने मंत्रालय-महसूल-जिल्हा प्रशासन यांच्यातील प्रक्रिया वेगाने कशी पुढे सरकली? हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण सरकारी कागदपत्रांची हालचाल साधारणतः पान २ वर

## टीईटी परिक्षेबाबत अफवांवर विश्वास नको

मुंबई दि.६ (प्रतिनिधी):- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयामार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२५ परीक्षचे आयोजन रविवार, २३ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आले आहे. याबाबत सर्व संबंधितांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in व http://mahatet.in या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना व माहितीचे अवलोकन करावे. परीक्षेसंबंधी कोणत्याही चुकीच्या व दिशाभूल करणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.
महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) च्या आयोजनाची कार्यवाही सुरू असून, परीक्षेसंबंधित कार्यवाहीबाबत वेळोवेळी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर अधिकृत माहिती देण्यात येते. पान २ वर

## इंदुरीकर यांच्या मुलीचा शाही साखरपुडा चर्चेत

अहमदनगर दि.६ (वृत्तसेवा):- प्रसिद्ध कीर्तनकार निवृत्ती महाराज देशमुख उर्फ इंदुरीकर महाराज यांच्या कन्येच्या नुकत्याच पार पडलेल्या साखरपुड्याच्या सोहळ्यावरून



चर्चा सुरु झाली आहे. कीर्तनातून लग्नातील अनावश्यक खर्चावर टीका करणारे महाराज स्वतःच्या मुलीच्या साखरपुड्यावर लाखोंची उधळपट्टी करत असल्याचा गंभीर आरोप मुंबई डबेवाला संघटनेच्या अध्यक्षांनी केला. या सगळ्या वादावर इंदुरीकर महाराज यांनी कार्यक्रमातच स्पष्टीकरण दिलं. मुलीच्या साखरपुड्यात मोठ्या प्रमाणात झालेल्या खर्चामुळे टीका होत असली तरी त्यांनी आलेल्या मान्यवरांचा सत्कार सोहळा टाळला. कीर्तनकार इंदुरीकर महाराज यांची कन्या ज्ञानेश्वरीचा साखरपुडा नुकताच संगमनेर येथील पान २ वर

## आधी अभ्यास करा मग बोला
### बच्चू कडूंना हायकोर्टानं झापलं

नागपूर दि.६ (वृत्तसेवा):- बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी नागपूरमध्ये मोठे आंदोलन केले. त्यांच्या महाएल्गार आंदोलनामुळे दोन दिवस नागपूरमध्ये वाहतुकीची कोंडी झाली होती. याची दखल घेऊन न्यायालयाने त्यांना रस्ता मोकळा करण्याचे आदेश दिले होते. यावर कडू यांनी न्यायालय वाहतुकीच्या कोंडीची लगेच दखल घेते मात्र शेतकऱ्यांच्या आत्महत्येची का घेत नाही अशी विचारणा केली होती. यावर न्यायालयाने परखड मत व्यक्त केले. तुम्ही शेतकऱ्यांसाठी किती न्यायालयीन लढे दिले, अशी विचारणा करून कडू यांना करून न्यायालयाने स्पष्ट पान २ वर

# अल्पवयीन मुलीचे तोंड दाबून केले दुचाकीवरून अपहरण पण केज जवळ येताच मुलीने मोठ्याने ओरडून केली सुटका

केज, दि. ६ (प्रतिनिधी)- शेतात जावून आपल्या वडिलांना जेवण देऊन येवता येथे ११ वर्षाची मुलगी घराकडे परत येत असताना मोटार सायकलवर आलेल्या अज्ञात इसमाने तोंड दाबून तिचे अपहरण करून नेण्याचा प्रयत्न केला. पण केज जवळ येताच मुलीने आरडाओरडा केल्यामुळे अपहरणकर्त्याने तिला रस्त्यातच सोडून पोबारा केला. अशी खळबळजणक घटना बुधवार दिनांक ५ नोव्हेंबर रोजी सकाळी १० च्या दरम्यान तालुक्यातील जीवाची वाडी येथे घडली. या मुलीचे अपहरण करून आरोपी लहुरी, कानडे मार्गे २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या केजला आल्यानंतर येवता चौक ,लहुरी आणि कानडी माळी येथील दुकानात समोर लावण्यात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याने दुचाकी नंबरसह तो कैद झाल्याची माहिती समोर आली. त्यामुळे आरोपीला लवकरच पकडण्यात येईल असा विश्वास केज ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांनी दाखवला. दरम्यान मुलीच्या अपहरणा संदर्भातील ही तालुक्यातील चौथी घटना असल्याचे समोर आले आहेत.

समोर आलेल्या माहितीनुसार सदर मुलगी तिच्या शेतातील वडिलांना जेवण देऊन घराकडे पायी चालत येत होती. रस्त्यात तिला एकटी पाहून दुचाकी वरून आलेल्या अनोळखी व्यक्तीने तिला रस्त्यात अडवून प्रथम तिच्या वडिलांची चौकशी केली. तूजा वडीलाकडे माझे पैसे आहेत, मला त्यांना भेटायचे आहे असे सांगितले. तेव्हा तिने चला मी तुम्हाला वडिलांकडे शेतात घेवून जाते असे त्या व्यक्तीला सांगितले. तसे त्याने मुलीच्या पान २ वर

### पोलिसांनी आरोपीची वाजत गाजत धिंड काढावी

केज पोलिसांनी आरोपीला पकडल्यानंतर त्याची ज्या ठिकाणाहून तिचे अपहरण केले त्या ठिकाणाहून केजपर्यंत वाजवीत वाजवीत धिंड काढावी अशी मागणी संतप्त वर्गातून करण्यात आली. तर अशा घटना घडत असतील तर एकट्या दुकट्या मुलींना बाहेर पाठवणे देखील धोक्याचे होऊन बसले आहे याला कुठेतरी आळा घातला गेला पाहिजे अशी मागणी देखील केली.

पाहिजेत
कोळाई मल्टीपर्पज अर्बन निधी.
लि. शिरूर कासार, जिल्हा बीड
कर्मचारी भरणे आहे
क्लार्क - 01
कॅशियर - 01
या दोन पदाकरिता शैक्षणिक पात्रता पदवीधर अथवा बारावी उत्तीर्ण असावा. तसेच कॉम्प्युटरची माहिती असणे आवश्यक. अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. (महिलांना पण प्राधान्य देण्यात येईल.).
- अधिक माहितीसाठी संपर्क -
9420022441
9673718171
15970-14185

## पाटोदा तालुक्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची केंद्रीय पथकाने केली पाहणी

पाटोदा दि ६(प्रतिनिधी)- अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे झालेल्या या मोठ्या नुकसानीचा



आढावा घेण्यासाठी आलेल्या केंद्रीय पथकाने दिनांक ५ नोव्हेंबर रोजी पाटोदा तालुक्यातील कारेगाव येथील झालेल्या नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या ठिकाणच्या झालेल्या नुकसानीचा आढावा पथकाला दिला.पथकात एसव्हीएसपी शर्मा , विशाल पांडे यांचा समावेश होता.
यावेळी मौजे कारेगाव येथील बाधित शेतकरी ८६९, बाधित क्षेत्र ९९८ हेक्टर, अपलोड केलेली संख्या ८०५, निधी वितरण ८४,८३००० घर पडझड १८ ची माहिती तसेच जमीन खरडून जाणे बाधित शेतकरी १६७ बाधित क्षेत्र २०.१२ हे.आर. पान २ वर

## अमरसिंह पंडितांनी गेवराई नगराध्यक्ष पदासाठी केली सौ.शितलताई महेश दाभाडेंच्या नावाची घोषणा





बीड दि.६ (प्रतिनिधी):- गेवराईकरांसाठी हक्काचा माणूस पाहिजे आहे. रात्री अपरात्री, पहाटे ज्याला आपण हक्काने बोलू शकतो असा माणूस पाहिजे म्हणून गेवराई शहराचा प्रथम नागरीक होण्याची संधी तुम्हाला द्यायची असेल तर तुमचा आमचा उमेदवार म्हणून महेश दाभाडे, शीतलताई दाभाडे यांना गेवराईचा नगराध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी द्यावी ही विनंती करण्यासाठी मी इथे आलोय असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस माजी आ.अमरसिंह पंडित यांनी शीतलताई महेश दाभाडे यांच्या नावाची घोषणा करुन राष्ट्रवादीचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार जाहीर केला आहे.
गेवराई शहरात गुरुवारी सायंकाळी विठ्ठल आबा पवार यांच्यासह कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला, माजी आ.अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत झालेल्या प्रवेश सोहळ्यास महेश दाभाडे यांच्यासह पान २ वर

CMYK

# गुरु नानकदेव एक धर्मात्मा



व्यापार उद्योग हे त्यांचे निर्वाहसाधन होते वडिलांनी मुलाची जन्मपत्रिका तयार करून घेतली. योग असा की ती पत्रिका खरी ठरली. हा मुलगा सर्व धर्माच्या लोकांना प्रिय असा महात्मा होईल. हिंदू त्याला मानतील. मुस्लिम त्याचे ऐकतील. तो परमेश्वराचा पाईक ठरेल. हा योगायोग मानला तरी त्यामुळे चरित्राची वास्तवता ओसरत नाही. त्यांचे प्रारंभिक शिक्षण एका हिंदू पंडिताकडे व नंतर एका मुस्लिम मौलवीकडे झाले. संस्कृत आणि पर्शियन या दोन्ही भाषांची तोंडओळख झाली. पूर्वी शिकणे हे नोकरीसाठी नव्हते. तात्त्विक आणि व्यावहारिक शहाणपणाची ती प्रस्तावना मानली जाई. आपल्या मुलाने उपजीविकेसाठी एखादा व्यवसाय करावा. वेळेवर लग्न करावे व प्रपंच थाटावा अशी पित्याची अपेक्षा होती. वडिलांनी एकदा त्यांना भांडवल दिले. आवडीप्रमाणे व्यवसाय कर असे सांगितले. या मुलाने या रकमेचा विनियोग साधूसेवेसाठी केला. घर बुडवणारा हा व्यवसाय पुन्हा करू नको, अशी समज मुलाला देण्यात आली. योगायोगाने त्यांना सरकारी म्हणजे बादशाही धान्यगोदामावर काम मिळाले. त्यांनी काम चोख केले. पण त्यांची परोपकार वृत्ती आणि गोरगरिबांना मदत करण्याची सवय वाढतच गेली. त्यांच्या परिश्रमामुळे शासनाला फायदा झाला. मात्र त्यांचे दातृत्व हे बहुतेक सरकारी सत्तेच्या गैरफायद्यामुळे घडत असावे, असा अनुदार तर्क अनेकांनी केला. शेवटी चौकशी झाली, झडती घेण्यात आली. सत्याचा शोध लागला. नानकांचे चारित्र्य निष्कलंक ठरले.

अशा या विचित्र प्रकारामुळे नानकांची विवाहित बहीण नानकी आपल्या भावाला म्हणाली, हे सर्व व्याप सोड आणि वडिलांच्या समाधानासाठी संसार कर. देव तुझ्याबरोबर राहील. नानकांनी बहिणीच्या इच्छेला मान दिला. काही काळ संसार केला. त्यांना दोन पुत्र झाले. एकाचे नाव श्रीचांद व दुसरा लक्ष्मीदास. यापैकी पहिला वडिलांप्रमाणे विरक्त निघाला व त्यांच्याच उपदेशकार्यात रममाण झाला. योगायोगाने नानकसाहेबांना दोन जिवाभावाचे सोबती भेटले. ते जन्मभर त्यांच्यासमवेत राहिले. एक होता भाई बाला व दुसरा तो गायक मर्दाना. नानकसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे आकर्षण हेच या भावबंधाचे कारण.

नानकसाहेबांचे नित्यजीवनातील वर्तन हे या दोघांना जवळून घडलेले दर्शन होते. नानकांच्या मुखातून बाहेर पडणारी वचने हेच त्यांचे वेद होते. या वेदातून प्रकट झालेला धर्म हा नानकधर्म, शीखधर्म, गुरुधर्म अशा नावाने ओळखला जातो. मंदिर आणि मशिद ही प्रार्थनास्थळे आहेत. प्रार्थना ही परमत्त्वाची असते. हे परमेश्वरी रूप सर्वांना समजूउमजू शकते. पण त्यासाठी दंभ, ढोंग, मूढता व अनाचार यापासून दूर राहावे लागते. माणसामाणसात रंगारूपाचा फरक असतो. पण अंतर्यामी सगळे समान असतात. सर्वांचा श्वास एक, ध्यास एक असतो. देव सर्वांना हवा असतो.

भारतात हिंदू आणि मुसलमान या दोन्हीही समाजात आढळणारी धर्मांधता दूर व्हावी व सर्वांतर्यामी एकच परमतत्त्व आहे, हे सर्वांनी जाणावे असा विचार भावभक्तिपूर्वक मांडणारे नानकदेव आपल्या असंख्य चाहत्यांची एक मंदियाळी मागे ठेऊन इ.स. १५३९ मध्ये वयाच्या सत्तराव्या वर्षी निजधामास गेले. त्यांनी आपला एक मानसपुत्र लेहना याला अंगद असे नाव दिले. आपल्या कार्याचे निशाण त्याच्या खांद्यावर ठेवले. त्यांचा वारसपुत्र जवळ होता. पण मानसपुत्राची त्यांनी एवढ्याचसाठी निवड केली की भाऊबंदकीच्या शापाने परमार्थ म्लान होऊ नये. सत्य हे चिरकाल असते.

कालातीत अशा सत्याचा जयजयकार करणाऱ्याने म्हणावे, जय सत श्री अकाल.

- समाप्त-



**संजय राऊत, बीड.**

# बीडच्या प्रभाग क्रमांक ६ मधून जैद कादरी तुतारीकडून इच्छुक

बीड दि.७ (प्रतिनिधी):- शहरातील जुना बाजार सह इतर भागातील प्रभाग क्रमांक ६ मधून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून तुतारी या चिन्हावर निवडणूक लढविण्यास सामाजिक कार्यकर्ते जैद कादरी इच्छुक आहेत. या प्रभागात राहणाऱ्या मतदारांनीही त्यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी लावून धरली आहे.



जैद कादरी हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत. सर्वसामान्यांसाठी ते वेळी अवेळी धावून जातात. जिल्हा रुग्णालय, पोलीस ठाणे, तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, महावितरण कार्यालय असो की अन्य कोणतेही शासकीय-प्रशासकीय कार्यालय अशा ठिकाणी अडल्या-नडलेल्यांची कामे करण्यासाठी ते सदैव पुढाकार घेतात. याकरिता मतदारांमध्ये त्यांच्याविषयी हक्काचा माणूस अशी भावना आहे. युवा नेतृत्व म्हणून त्यांनी सातत्याने सामाजिक बांधिलकी जपलेली आहे. सर्वांच्या सुखदुःखात धावून जाणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.बीड विधानसभा मतदारसंघाचे आ.संदीपभैय्या क्षीरसागर आणि माजी आमदार सय्यद सलीम यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून तुतारी या चिन्हाची उमेदवारी जैद कादरी यांना द्यावी अशी मागणी मतदारांकडून करण्यात येत असून त्यांना उमेदवारी दिल्यास त्यांचा विजय निश्चित असल्याचेही मतदार बोलून दाखवत आहेत. त्यांना पक्षाकडून उमेदवारी मिळाली नाही तर त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवावी अशी मागणीही नागरिकांमधून होत आहे.

## प्रसिद्ध अभिनेत्री, गायिका सुलक्षणा पंडित काळाच्या पडद्याआड

मुंबई दि.६ (प्रतिनिधी):- प्रसिद्ध अभिनेत्री आणि गायिका सुलक्षणा पंडित यांचे वयाच्या ७१ व्या वर्षी निधन झाले आहे. गुरुवार दि.६ नोव्हेंबर रोजी त्यांनी मुंबईतील नानावटी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. पंडित गेल्या काही काळापासून खूप आजारी होत्या. तसेच त्या गेल्या १६ वर्षांपासून अंथरुणावर होत्या. त्यांच्या निधनामुळे चित्रपट आणि संगीत क्षेत्रात शोककळा पसरली आहे. प्रसिद्ध अभिनेत्री आणि गायिका सुलक्षणा पंडित यांनी ७० आणि ८० च्या दशकात आपल्या मधुर आवाजाने आणि अभिनयाने प्रेक्षकांना भूरळ घातली होती.



गुरुनानक जयंती निमीत्त डॉ.योगेश क्षीरसागर व शुभमभैय्या धुत यांचा सत्कार करुन प्रसाद देतांना डॉ.मदन जेसवाणी, दिपक आहुजा, सौ.प्रीत कुकडेजा, आनंद कुकडेजा, हितेश आसनानी व सिंधी-पंजाबी समाज.

# पार्थ प्रकरणावरुन अण्णा हजारे कडाडले

राळेगण सिद्धी दि.७ (वृत्तसेवा):- पुण्यातील कोरेगावमधील ४० एकर जमिनीच्या खरेदीवरुन उपमुख्यमंत्री अजित पवारांचे चिरंजिव पार्थ पवार अडचणीत सापडले आहे. तब्बल १८०४ कोटी रुपये किंमतीची ही जमीन केवळ ३०० कोटी खरेदी झाल्याचा समोर आले आहे. याच मुद्यावर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. एखाद्या मंत्र्याचा मुलगा चुकीचे वागत असेल तर तो मंत्र्याचा दोष आहे. त्यासाठी संस्कार हे महत्त्वाचे असतात.

एखादा व्यक्ती घडण्यासाठी कुटुंबाचे संस्कार, घराण्याचे संस्कार, गावाचे संस्कार, समाजाचे संस्कार हे खूप महत्त्वाचे असतात, असा हल्लाबोल अण्णा हजारे यांनी पवार कुटुंबावर केला. त्याचवेळी राळेगण सिद्धी किती मोठे गाव आहे, पण कधीही गडबड नाही. गोंधळ नाही, असेही हजारे म्हणाले.

दरम्यान, आज राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील अण्णा हजारे यांची भेट घेतली होती. त्या भेटीनंतर अण्णा हजारे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अशा प्रकरणांविरोधात कारवाई करण्यासाठी सरकारने विशेष धोरणे आखून अवलंब केला पाहिजे.

अण्णा हजारे यांनी आज राळेगणसिद्धीत प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी पार्थ पवार जमीन घोटाळा प्रकरणार भाष्य केले.

पार्थ पवार यांच्या प्रकरणात कारवाई झाली पाहिजे. पण असले प्रकार केवळ कारवाई थांबणार नाही. अशा प्रकरणांविरोधात कारवाई करण्यासाठी सरकारने विशेष धोरणे आखून त्याचा अवलंब केला पाहिजे. या प्रकरणाविरोधात कठोर पावले उचलली पाहिजेत. असे वागणा-या लोकांना कडक शासन केले पाहिजे, असेही अण्णा हजारे म्हणाले. पुण्यातील कोरेगाव पार्कमधील ४० एकर जमिनीच्या व्यवहारावरुन पार्थ पवार यांच्यावर आरोपांच्या फैरी झडत आहेत. त्यांच्यामुळे अजित पवारही अडचणीत आले आहेत.

पान १ वरुन

## मनोज जरांगे पाटलांच्या हत्येचा कट उघड

पाटलांच्या ओळखीतील काही जण उपस्थित होते. या बैठकी दरम्यान हत्येसाठी अडीच कोटी रुपयांची डील ठरल्याची चर्चा आहे. ही माहिती मिळताच गंगाधर काळकुटे यांनी पोलिसांकडे लेखी निवेदन देऊन तक्रार केली. प्राथमिक चौकशीत आरोपींनी एका मोठ्या राजकीय नेत्याचे नाव घेतल्याचे समोर येत असले तरी पोलिसांनी अद्याप तशी माहिती जाहीर केलेली नाही. जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचल्याचे उघड होताच सोशल मीडियातून प्रचंड संताप व्यक्त होऊ लागला आहे. जरांगे पाटील एकटे नाहीत, समाजाचा महासागर त्यांच्या पाठिशी आहे अशा पोस्ट व्हायरल होऊ लागल्या आहेत. काही जणांनी या माध्यमातून आरोप-प्रत्यारोप देखील सुरु केले आहेत. जातीय पोस्ट देखील व्हायरल करुन तणाव वाढविण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे समोर आले आहे. या सर्व प्रकाराच्या अनुषंगाने जरांगे पाटलांनी मराठा समाज बांधवांना शांत राहण्याचे आवाहन केले आहे.

## दादा, तुम्ही कार्यकर्त्यांनाच शहाणपण शिकविता

काही दिवसांपासून काही आठवड्यांपर्यंत होत असते, अशावेळी ही फाईल असामान्य वेगाने पुढे कशी सरकली? हा मुख्य संशयाचा मुद्दा बनला आहे.

उच्चस्तरीय चौकशी समितीची स्थापना

या प्रकरणी विरोधकांनी टीका केल्यानंतर राज्य सरकारने लक्ष घालत तात्काळ कारवाई केली. राज्य सरकारने प्रथम टप्प्यात पुणे तहसीलदार सूर्यकांत येवले यांना तात्काळ निलंबित केले आहे. यासोबतच महसूल विभागातील नोंदी, जमीन मूल्यांकनाचा आधार, तसेच स्टॅम्प ड्युटी माफीची प्रक्रिया कायदेशीर पद्धतीने झाली का याची तपासणी करण्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय चौकशी समिती नेमली आहे.

समितीकडून जमीन ताबा, महसूल मूल्य, खरेदी अर्ज, कागदपत्रांची हालचाल, फाईल मंजुरीचा वेग आणि संबंधित अधिकाऱ्यांचा सहभाग यावर तपशीलवार अहवाल मागवण्यात आला आहे. तपासात दोषी आढळल्यास आणखी अधिकाऱ्यांवरही कारवाई होण्याची शक्यता आहे.

या प्रकरणातील मुद्दे गंभीर - मुख्यमंत्री

या प्रकरणाची थेट दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या प्रकरणातील मुद्दे गंभीर आहेत. महसूल विभाग, आयजीआर आणि लँड रेकॉर्डकडून सर्व माहिती मागवली आहे. प्राथमिक तपासानुसार कारवाई सुरू करण्यात आली आहे. संपूर्ण दस्तऐवजांचा अभ्यास झाल्यानंतरच पुढील भूमिका स्पष्ट केली जाईल.''

## नेमके काय प्रकरण?...

**लागणार असताना, या व्यवहारात फक्त ५०० रुपयांतच नोंदणी पूर्ण करण्यात आली. शिवाय, जमीन खरेदीची नोंदणी झाल्यानंतर अवघ्या ४८ तासांतच स्टॅम्प ड्युटी माफीचा निर्णय मंजूर करण्यात आला.**

## अल्पवयीन मुलीच्या अपहरणाचा प्रयत्न...

नाकासमोर पावडरचा वास देऊन तिचे तोंड दाबून बळजबरीने दुचाकीवर बसवून तिचे अपहरण केले. जीवाचीवाडी येथून तिला केजकडे घेऊन येत असताना केज जवळ असलेल्या कानडी रोड लगतच्या वीटभट्टी जवळ आल्या नंतर तिने आरडाओरड केल्यानंतर अपहरणकर्त्याने त्या मुलीला रस्त्यातच सोडून दुचाकीवरून वरून पोबारा केला.

यानंतर कानडी रस्त्यावरील वीट भट्टीपासून ही अकरा वर्षाची मुलगी केज बस स्थानकावर चालत आली. तसे बसस्थानकावर असलेल्या तिच्या नातेवाईक महिलेची भेट झाली. नातेवाईक महिलेने मुलीच्या वडिलांना कॉल करून माहिती दिली.मुलीचे वडील केज येथे येऊन मुलीला ताब्यात घेवून ते मुलीसह केज पोलिस ठाण्यात गेले. मुलीच्या वडिलांच्या फिर्यादीवरून अज्ञात अपहरणकर्त्या विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला. पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक उपनिरीक्षक अशोक सोनवणे हे पुढील तपास करीत आहेत. दरम्यान अल्पवायीन मुलीच्या अपहरणाच्या घटना केज तालुक्यात वाढल्या आसून अल्पवयीन मुलीच्या अपहरणाची ही आठवड्यातील ही चौथी घटना असल्यामुळं तालुक्यात एकच खळबळ उडाली . पालक वर्गात चिंता वाढली आहे.

## टीईटी परीक्षेबाबत अफवांवर विश्वास नको

तथापि, परीक्षेसंबंधी यूट्यूब चॅनेल्स, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे व प्रसार माध्यमाद्वारे दिल्या जाणाऱ्या चुकीच्या व दिशाभूल करणाऱ्या बातम्या/ अफवांवर विश्वास न ठेवता महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना व माहितीचे अवलोकन करावे. परीक्षेसंबंधी कोणत्याही चुकीच्या व दिशाभूल करणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवून झालेल्या नुकसानीस उमेदवार/ विद्यार्थी सर्वस्वी जबाबदार असतील, याची गांभीर्याने नोंद घ्यावी, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

## इंदुरीकर यांच्या मुलीचा साखरपुडा चर्चेत

'वसंत लॉन्स' येथे मोठ्या थाटामाटात पार पडला. या सोहळ्याला काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थितीत होते. मात्र शाही सोहळ्यातील खर्चावरून इंदुरीकर महाराजांवर तीव्र टीका सुरू झाली आहे. लोकांना दाखवण्यासाठी कर्ज काढून आपल्या मुला-मुलींचे लग्न मोठ्या थाटात करू नका, लग्न साध्या पद्धतीनं करा, साध्या पद्धतीने लग्न केले तरी मुलं होतात, असा सल्ला इंदुरीकर यांनी आपल्या कीर्तनातून दिला होता. दुसरीकडे, दुसऱ्यांना अक्कल शिकवणारे इंदुरीकर महाराज आपल्या मुलीच्या साखरपुड्यासाठी लाखो रुपयांचा खर्च करतात अशी टीका मुंबई डबेवाला संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी केली.

## नगराध्यक्ष पदासाठी सौ.शीतलताई दाभाडेंच्या नावाची घोषणा

पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी झालेल्या एका प्रवेशाच्या कार्यक्रमात माजी आ.अमरसिंह पंडित यांनी गेवराई नगराध्यक्ष पदासाठीचा राष्ट्रवादीचा उमेदवार जाहीर केला. यावेळी बोलतांना अमरसिंह पंडित म्हणाले, गेवराई नगर पालिके अंतर्गत अनेक प्रश्न आहेत, पिण्याचे पाणी, स्वच्छता, रस्ते, नाल्या, लाईट असे अनेक सर्वसामान्यांची निगडीत महत्वाचे प्रश्न आहेत. मूळ गेवराई आहे, तेथील जे काही प्रश्न राहिलेले आहेत त्या प्रश्नांसाठी काम करणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले. गेवराई नगर पालिकेत हक्काचा माणूस असणे आवश्यक आहे. मी अनेकांशी चर्चा केली, त्यानंतरच आज तुमच्या सर्वांच्या साक्षीने आणि मान्यतेने शीतलताई महेश दाभाडे यांना गेवराई नगरीच्या प्रथम नागरीक होण्याचा मान द्यायचा आहे असे म्हणत अमरसिंह पंडित यांनी गेवराई नगराध्यक्ष पदासाठी महेश दाभाडे यांच्या पत्नी शीतलताई दाभाडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. उपस्थितांनी टाळ्या वाजवून या घोषणेचे स्वागत केले.

## आज मठाधिपती पाटांगणकरांचे कीर्तनाने...

वैष्णवांच्या अधिकारात आणि भाग्याचा ठेवा आहे, त्याचे महत्त्व धार्मिक आणि सामाजिक तत्त्वासाठी पूरक, पोषक असा हा काल आहे ,याचे यथार्थ प्रबोधन आपल्या रंजकशैलीतून श्री अमृतमहाराजांनी विशद केले.

३० ऑक्टोबर श्री ज्ञानेश्वरी पारायण पासून च्या भरगच्च कार्यक्रमाची सांगता आज काल्याच्या कीर्तनाने झाली. सर्वांसाठी महाप्रसाद झाला, तसेच आज शुक्रवार ७ नोव्हेंबर रोजी सकाळी मठाधिपती श्री विनायक महाराज यांच्या लळीताच्या कीर्तनाने महोत्सवाची सांगता होत आहे.

दरवर्षी चढत्या क्रमाने भाविक भक्तांची संख्या थोरले पाटंणगणावर दिसून येत असून परमार्थिक, सात्विक ,भावपूर्ण मंत्र जागर, भजन पारायणाचे सफल संयोजन पाटंगणावर होताना दिसून येते.

## बच्चू कडूंना हायकोर्टानं झापलं...

शब्दात आपली नाराजी व्यक्त केली.उच्च न्यायालयाने शेतकऱ्यांच्या विविध मुद्यावर अनेक सकारात्मक आदेश दिले आहेत. याचा अभ्यास कडू यांनी करावा. मग विधान करा, अशा शब्दात उच्च न्यायालयाने त्यांना सुनावले. आम्ही शेतकऱ्यांच्या किंवा आंदोलनाच्या विरोधात नाही. परंतु, तुम्ही महामार्ग अडवून सामान्य नागरिकांना त्रास होईल, असे कृत्य केल्याने उच्च न्यायालयाला याची दखल घ्यावी लागली असेही यावेळी न्यायमूर्तींनी स्पष्ट केले.

## पाटोदा तालुक्यात केंद्रीय पथकाची पाहणी

त्याची रक्कम रुपये ८,४६,२७०/- तसेच विहिरीमध्ये गाळ जाणे/ विहीर भुजने बाधित शेतकरी ४८ याबाबत शेतकऱ्यांसोबत संवाद साधून मा. जिल्हाधिकारी बीड यांनी माहिती सांगितली तसेच रब्बी बी बियाणांसाठी हेक्टारी १० हजार रुपये याबाबत अनुदानाची मागणी करण्यात आलेली आहे. तसेच शेती, फळबागा, रस्ते, पूल, वीजपुरवठा आणि घरांचे मोठे नुकसान झाल्याचे पथकाने नोंदवले. पाहणीदरम्यान जिल्हा परिषद मुख्य अधिकारी जितीन रहिमान जिल्हा कृषी अधिकारी मा. सुभाष साळवे, मा उपविभागीय अधिकारी पाटोदा वसीमा शेख मा. तहसीलदार डी.बी.निलावाड, तालुका कृषी अधिकारी, पाटोदा, गटविकास अधिकारी, पाटोदा, मंडळ अधिकारी विभाग अंमळनेर, ग्राम महसूल अधिकारी दिपाली लांडगे नाळवंडी, ग्रा. म. अ. डोंगरकिन्ही बाळूबडे, ग्रा. म. अ. अंमळनेर येवले , ग्रा. म. अ. कोतन मस्के यांच्यासह सर्व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पान ६ वरुन

## रामलिंग मुंडे यांना सर्वाधिक पसंती

सुख दु:खात सहभागी होऊन त्यांना आधार देण्याचे तसेच शासकीय कार्यालयातील लोकांचे प्रश्न सोडवून त्यांना न्याय देण्याचे कार्य केले आहे तसेच त्यांनी आतापर्यंत भाजपचे आणि पंकजा यांचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणूनच काम केले आहे धुनकवड पंचायत समिती गणात त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे त्यामुळे भाजपने रामलिंग मुंडे यांच्यासारख्या कर्तव्यदक्ष उच्चशिक्षित सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी लढणाऱ्या प्रामाणिक कार्य करणाऱ्या युवकास संधी द्यावी अशी मागणी धुनकवड पंचायत समिती गणातील सर्वसामान्य जनतेची आहे.

## जरांगे पाटील यांना

जरांगे पाटील यांच्या जिवीतास धोका निर्माण झाल्याने त्यांना झेडप्लस सुरक्षा प्रदान करावी अशी मागणी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.प्रकाश सोळंके यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांचेकडे केली आहे.

## एसटी महामंडळाचे वाहक

महादेव खांडे, रमेश खेडकर, रमेश कानडे, आनंद जगताप, प्रशांत क्षीरसागर, भांगे, सुक्रेमॅडम पांचाळ मॅडम सुनील टाक, उपरे, राजाभाऊ वाघ, पत्रकार ज्ञानोबा वायबसे आदींची उपस्थिती होती.यावेळी उत्तम तोटेवाड यांनी प्रामाणिक आणि उल्लेखनीय सेवा बद्दल उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून त्यांचा गौरव केला. उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

## माजलगावात नगराध्यक्ष उमेदवारीसाठी शेख मंजूर चर्चेतले नाव

अर्धवट बांधकाम होऊन पडीक पडलेल्या नगर परिषदेची सुसज्ज इमारत त्यांनी उभी करून शहराच्या वैभवात भर पाडली आहे.छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शासकीय विश्रामगृह मार्गावरील २० वर्षापासून रखडलेल्या रस्त्याचे काम पूर्णत्वास नेले आहे.मराठा भवन,आर्यवैश्य समाज,बुद्ध विहार मजलीस ए-उलेमा व श्याम पाठक नाट्यगृहासाठी नपमार्फत जागा उपलब्ध करून देऊन सर्व समाज बांधवांच्या मनात त्यांनी आपले एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. शहरात गल्लोगल्ली दर्जेदार रस्ते, नाल्यांची कामे करून नागरिकांच्या समस्या हलक्या केल्याने लोक समाधानी आहेत.शहर सुंदर करण्याचा प्रयत्न जनतेने अनुभवला आहे.स्वच्छता व पिण्याच्या पाण्यावर स्वतः जातीने लक्ष देऊन शहरात पाईपलाईनचे मोठे काम करून नगराध्यक्ष पदाचेदायित्व त्यांनी पार पाडलेले जनतेने बघीतले आहे.बेघर गोरगरीब लोकांसाठी केंद्र शासनाची पंतप्रधान आणि रमाई आवास योजना शहरात प्रभावीपणे राबवून अकराशे बेघर नागरिकांना हक्काचे घरे मिळवून देण्यात त्यांनी मोलाचा प्रयत्न केलेला लाभार्थी नागरिकांनी अनुभवला आहे. कार्यकाळ संपल्यानंतरही शेख मंजूर यांनी शहरातील समस्यासाठी नेहमी प्रशासनाकडे पाठपुरावा केला आहे.५० वर्षापासून येथे रहिवासी असणाऱ्या गरीब भोगवटदार लोकांच्या निवाऱ्यासाठी त्यांनी शासन दरबारी सतत पाठपुरावा केला आहे. दिव्यांग बंधूनाही शासनाचा निधी मिळवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे.प्रशासकीय काळातही शहराच्या हितासाठी कामचुकार मुजोर अधिकाऱ्यांना धारेवर धरण्यासाठी त्यांनी लोकशाही मार्गाने रस्त्यावर उतरून आंदोलने केलेली जनतेने पाहिले आहे.आज घडीलाही नागरिकांच्या वार्डा, प्रभागातील नागरी समस्या सोडवण्यासाठी त्यांच्या कार्यालयाची दरवाजे सतत उघडी असतात.माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांचा लेखाजोगा शहरवाशांनी गेल्या ४ वर्षात अनुभवला आहे.राजकीय संबंध नसणाऱ्या अनेक प्रतिष्ठित नागरिकांनी त्यांच्या कार्याला उघड पाठिंबा दिलेला सर्वश्रुत आहे.शेख मंजूर यांच्या या सर्व मोजमापाची दखल राजकीय पक्षाकडून शहरवासीयांना आहे.त्यामुळे शेख मंजूर नगराध्यक्ष पदासाठी शहरात चर्चेतले नाव आहे.नगर अध्यक्ष पद महिला ओबीसी साठी आरक्षित असल्याने शेख मंजूर व समर्थकांकडून त्यांच्या आई शेख यास्मिन बी चांदसाहाब यांचे नाव पुढे करण्यात आले आहे.आशा विकसिल नेतृत्वाच्या प्रतिनिधिला कोणत्याही पक्षाने किंवा स्थापन होणाऱ्या आघाडीने अपूर्ण राहिलेल्या शहर विकासासाठी नगराध्यक्ष उमेदवारीची संधी द्यावी. अशी नागरिकांकडून मागणी आहे.

## मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचणाऱ्या टोळीच्या म्होरक्याचा

नोंदी निघाल्या असून हैदराबाद सातारा गॅझेट अंमलबजावणी नंतर मोठ्या प्रमाणावर समाज बांधवांचा फायदा होत आहे. तर दुसरीकडे राजकारणी विरोधकांनी विरोध न करता खालच्या पातळीवर जाऊन घाणेरडे राजकारण केले आहे. संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचल्याची तक्रार जालना पोलिसात दाखल करण्यात आली असून या कटाच्या मागचा म्होरक्या कोण? याचा शोध घेणे गरजेचे आहे.असे कट रचले जात असेल तर ही खूप गंभीर बाब आहे. याचा शोध पोलिसांनी तात्काळ घेण्याची गरज आहे. सरकारने आणि पोलिस यंत्रणेकडून शोध घ्यावा अशी मागणी मराठा सेवक मनोज शेंबडे, सरपंच नवनाथ गवते, तुकाराम तळतकर, अविनाश गवळी पांडुरंग पवार यांनी केली आहे.

## भारत काळे हे पुन्हा जिल्हा परिषद सदस्य होणार

परिषद गटातुन निवडणुकीच्या मैदानात उतरत आहेत. नेकनूर जिल्हा परिषद गटाचा सर्वांगीण विकास करण्याचे ध्येय घेऊन, माजी जिल्हा परिषद सदस्य भारत काळे यांनी आगामी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. आजपर्यंत मायबाप जनता जनार्दन आणि मतदारांच्या आशीर्वादावर त्यांनी विकासाचा जो 'यज्ञ' सुरू केला आहे, तो पूर्णत्वास नेण्याचा त्यांचा निर्धार आहे. विशेषतः श्री गुरु बंकट स्वामी यांच्या पावनभूमीत राहिलेला विकासाचा अनुशेष पुढील काळात पूर्णपणे भरून काढणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे.

नेतृत्वाचा मोठा आधार मिळाल्याने नेकनूर सर्कलमध्ये विकासाची गंगा

भारत काळे यांनी आपल्या कामाची दिशा स्पष्ट करताना, त्यांना मिळालेल्या नेतृत्वाचा उल्लेख केला. महाराष्ट्र राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे आणि बीड जिल्ह्याच्या माजी खासदार प्रीतमताई मुंडे यांच्या माध्यमातून त्यांना नेहमीच पाठबळ मिळाले आहे. यासोबतच, केज-अंबाजोगाई मतदार संघाच्या कार्यकुशल आमदार नमिताताई मुंदडा यांच्या नेतृत्वात, तसेच बीड जिल्ह्याचे भाजपचे ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा आणि युवा नेते अक्षय मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली नेकनूर जिल्हा परिषद गटात विकासाची 'गंगा' आणण्यात आली. अनेक महत्त्वपूर्ण कामे मार्गी लागली आहेत. तसेच श्री गुरु बंकटस्वामीच्या पावनभूमीसह गटात काही विकासकामे वेगाने होण्याची गरज असल्याचे काळे यांनी सांगितले.

*नेकनूरच्या विकासासाठी निवडणूक लढणार अन् जिंकणार - भारत काळे*

नेकनूर गटातील विकासाचा राहिलेला प्रत्येक अनुशेष भरून काढण्यासाठीच मी ही निवडणूक लढवण्याचा आणि जिंकण्याचा निर्धार केला आहे. जनतेने आतापर्यंत ज्याप्रमाणे आशीर्वाद दिला, त्याचप्रमाणे मतदानरुपी आशीर्वाद देऊन मला जिल्हा परिषदेच्या सभागृहात पाठवतील, असा माझा प्रगढ विश्वास आहे. भारत काळे यांनी व्यक्त केलेला हा विश्वास आणि विकासाची तळमळ पाहता, नेकनूर जिल्हा परिषद गटातील जनता त्यांना नक्कीच निवडून देणार असल्याचे बोलले जात आहे.

## बीड बसस्थानकासमोर ट्रॅव्हल्सची गर्दी

पोलीसांनी काटेकोर अंमलबजावणी अपघातास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.अपघात झाल्यास जबाबदार कोण?कोणताही आणखी अपघात झाल्यास,बीड शहर पोलीस व वाहतूक शाखाच जबाबदार!असा कडक इशारा नागरिकांकडून देण्यात आला आहे.उप प्रादेशिक वाहन कार्यालयाकडून खाजगी ट्रॅव्हल्सची तपासणी करावी तसेच गेल्या वर्षी नाशिक येथे झालेल्या ट्रॅव्हल्स अपघाता नंतर ट्रॅव्हल्सने पेट घेतला होता त्यावर ट्रॅव्हल्स वाल्यांनी काय उपाययोजना केल्या देखील तपासणी आवश्यक आहे. कारवाईच्या नावाखाली वसुली थांबवून ट्रॅव्हल्स वाल्यांना नियम दाखवावे व दोषी आढळल्यास कारवाई करून कायमस्वरूपी परवाना रद्द देखील करण्यात यावा अशी मागणी नागरिकांत होत आहे.

## संस्कार भारती बीडचा दिपोत्सव दिप 'वंदे मातरम् ने साजरा

करुन उपस्थितांची मने जिंकली.संस्कार भारतीचे संरक्षक कै.प्रभाकरराव महाजन सरांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद वझे यांनी तर सुत्रसंचलन सुरेश साळुंके यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भरत लोळगे,वासुदेव निलंगेकर, जिल्हा अध्यक्ष लक्ष्मीकांत सौंदत्तीकर, संतोष पारगावकर,अनंत सुतनासे , गणेश तालखेडकर, अनिल कुलकर्णी, अशोक कुलकर्णी, राहुल पांडव स्नेहा पारगावकर सोनल पाटील यांनी परिश्रम घेतले व कार्यक्रम यशस्वी केला.

## लिंबागणेश जि.प.गटातुन सुभाष मस्के प्रबळ दावेदार

सामाजिक काम गोरगरिबांची सेवा, स्वतः पुढाकार घेऊन . रक्तदान, आरोग्य व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून सुभाष मस्के यांनी समाजातील तरुणांना एकत्रित केले, गावपातळीपासून मस्के दाम्पत्याचा लोकांशी थेट संपर्क, घराघरात पोहोचणारी भूमिका आणि जनसामान्यांच्या अडचणींना प्राधान्य देणारी कार्यपद्धतीमुळे लिबागणेश गटात त्यांच्याचाबत सकारात्मक शरदचंद्र पवार गटातील विश्वासू अन् अग्रेसर चेहरा

आणि आमदार संदीप क्षीरसागर यांच्या विविध अभियानात सुभाष मस्के यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. युवा संघर्ष यात्रेसह अनेक मोहिमांमध्ये त्यांनी जबाबदारीने भूमिका बजावली. त्यांच्या कार्याची दखल घेऊन आमदार संदीप क्षीरसागर यांचे विश्वासू म्हणून त्यांच्यावर लिंबागणेश जि प गटामधून उमेदवारी देऊन विश्वास दाखवतील असा अंदाज सर्कल मध्ये केला जात आहे आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासोबत सुभाष मस्के नेहमी जनआंदोलनात आघाडीवर असतात. संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनातही मस्के सतत सक्रिय होते. गावपातळीवरुन त्यांनी वेळोवेळी आंदोलन उभारले, शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचाव्यात, यासाठी त्यांनी हजारो नागरिकांना प्रत्यक्ष लाभमिळवून दिला. अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकर्यांना मदत मिळावी म्हणूनही आमदार संदीप क्षीरसागर यांच्या माध्यमातून पाठपुरावा केला, तसेच लोकसभा निवडणुकीत खा. बजरंग सोनवणे यांना लिंबागणेश सर्कलमध्ये आघाडी मिळावी म्हणून सुभाष म्हस्केंनी गावागावात कॉर्नर सभा, घरभेटी आणि जनसंपर्क मोहिमा राबवल्या. त्यांच्या संघटन कौशल्याचा फायदा पक्षाला झाला. १० वर्षापासून जनसेवेत फक्त निवडणुकीच्या काळात नव्हे तर गेल्या १० वर्षांपासून जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने लढा देत, लोकांमध्ये मिसळून कार्य करणारे सुभाष मस्के हे लिंबागणेश परिसरात विश्वासू व जनआधार असलेले नेते म्हणून उदयास आले आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

पार्श्वभूमी

## गेवराई येथील प्रभाग क्र.चार मधून किशोर वाले न.प.निवडणूक लढणार

गेवराई दि.६ (प्रतिनिधी)- गेवराई येथील सावता नगर भागातील प्रभाग क्र.४ मधून राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाकडून माजी आ.अमरसिंह पंडित व आ.विजयसिंह पंडित यांनी उमेदवारी दिली तर न.प.निवडणूक लढविणार असल्याचे युवा कार्यकर्ते किशोर वादे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. प्रभाग क्रमांक चार मधून ओबीसी महिला राखीव प्रवर्गातून किशोर वादे यांची पत्नी सौ.किर्ती किशोर वादे या निवडणूक लढविणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. गेवराई न.प.निवडणूक दुरंगी होते की तिरंगी याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.माजी आ.अमरसिंह पंडित व आ.विजयसिंह पंडित यांनी सौ.किर्ती वादे यांना उमेदवारी दिली तर त्यांचा विजय निश्चित आहे असेही किशोर वादे यांनी म्हटले आहे.

## डॉ.अजय कदम उमरी गणासाठी उच्च विद्या विभूषित उमेदवार


केज दि ६ (प्रतिनिधी) - तालूक्यातील नवीन येवता गट खासदार बजरंग बप्पा यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. या गटात येवता व उमरी हे दोन गणांचा समावेश होतो आहे. येवता गट महिला ओबीसीसाठी राखीव आहे तर येवता गण महिला राखीव आहे. यातच कदमवाडी येथील डॉ. कदम अजय यांचे नाव जास्त चर्चेत असून उच्चशिक्षित उमेदवार असल्याने त्यांना आतापासूनच पसंती मिळू लागल्याचे सांगण्यात येते. डॉ कदम हे प्राध्यापक व प्राचार्य पदावर कार्य करूनही राजकारणात सक्रीय आहेत. याचे आश्चर्यही मतदारसंघात होत आहे. अशा परिस्थितीमध्ये विद्यापीठां मध्ये डॉक्टर ही पदवी संपादन केलेला एक तरुण आश्वासक उमेदवार उमरी मतदारसंघास मिळणार आहे. हि एक आश्वासक अशी बाब पहावयास मिळत आहे.डॉ. कदम अजय हे केज तालुक्याचे तालुका प्रवक्ता म्हणून २०१७ पासून काम करत आहेत.



# आष्टी तालुक्यातील सुलेमानदेवळा गाव परिसरात दोन बिबट्यांचा आठ दिवसांपासून मुक्काम

### जनावरांवरील हल्ल्याने ग्रामस्थ भयभीत वनविभागाने तात्काळ पावले उचलावीत-घोडके

अंभोरा दि ६ (प्रतिनिधी) -आष्टी तालुक्यातील सुलेमानदेवळा गावात मागील आठ दिवसांपासून दोन बिबटे नियमित दिसत असल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. गावाच्या पश्चिमेकडील वनीकरण क्षेत्रातील सर्वे नं. ५५ मधील डोंगराळ प्रदेशातील उंच दगडावर हे दोन्ही बिबटे संध्याकाळी ठाण मांडून बसतात, तसेच जनावरांवर देखील हल्ले करतात यामुळे शेतकरी भयभीत झाले असून वनविभागाने या संदर्भात त्वरित पावले उचलावीत अशी मागणी समाजसेवक परमेश्वर घोडके यांनी केली आहे.. या बिबट्यांनी गेल्या काही दिवसांत गावातील अनेक पाळीव कुत्रे, शेळ्या व बकऱ्यांचा बळी घेतल्याचेही उघड झाले आहे. त्यामुळे शेतकरी व गावकरी मोठ्या चिंतेत आहेत. मानवी वसाहतीलगतच या बिबट्यांची हालचाल सुरू असल्याने, संध्याकाळी तसेच पहाटे ग्रामस्थ घराबाहेर पडायलाही घाबरत आहेत.यातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे हे बिबटे भरदिवसाही गावाच्या वेशीवर तसेच शेती पायवाटांवर निर्भयपणे फिरताना ग्रामस्थांनी पाहिले आहे. लहान मुलांसह वृद्धांची सुरक्षितता धोक्यात आली असून, शाळेत जाणाऱ्या मुलांच्या पालकांची चिंता वाढली आहे.ग्रामस्थांनी ही माहिती वन विभागाकडे वारंवार पोहोचवली ; मात्र प्रत्यक्षात काहीही ठोस कारवाई न झाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी आहे. तरी वन विभागाने तात्काळ जाळे किंवा पिंजरा बसवून बिबट्यांना पकडण्याची मागणी करताना,बिबट्यांचा तातडीने बंदोबस्त न झाल्यास लवकरच मानवी जीविताला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. वन विभागाने ही गंभीर बाब तातडीने



हाताळावी. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते परमेश्वर घोडके यांनी केली.


## मुख्यमंत्री फडणवीस यांनी आश्वासन दिलं असलं तरी आता पाठपुराव्यावर भर द्यावा

शिरूरकासार दि ६(प्रतिनिधी)-शिरूर कासार तालुक्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणारा तिंतरवणी-निमगाव मायंबा-नांदेवाली-आर्वी-पाडळी फाटा हा राज्य मार्ग क्र. ६२ लवकरच साकार होणार असल्याचे मुख्यमंत्री फडवणीस यांनी आश्वासन दिले. यासंदर्भात विविध वृत्तपत्रात बातम्या झळकू लागल्या आहेत पण मुख्यमंत्र्यांनी जरी या मार्गासाठी आश्वासन दिले असले तरी संबंधित कार्यकर्त्यांनी त्याचा पाठपुरावा कायम चालू ठेवावा अशी जनतेमधून मागणी होऊ लागली आहे.शिरूरकासार येथील देवेंद्र फडणवीस यांचे कार्यकर्ते व पाडळी येथील नवनाथ सानप यांनी अलीकडेच मुंबई येथील मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी तिंतरवणी-निमगाव-आर्वी-पाडळी फाटा-रायमोह या महामार्गाच्या कामाबाबत चर्चा करून त्याच्या मंजुरीसाठी राज्य सरकारमार्फत केंद्र शासनाला शिफारस करण्याची विनंती केली.या प्रस्तावावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेत, संबंधित रस्त्याच्या कामासाठी महाराष्ट्र शासन केंद्र सरकारकडे शिफारस करून हा विषय मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.राज्य मार्ग क्र.६२ हा अनेक वर्षांपासून रखडलेल्या अवस्थेत आहे. या रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाल्यानंतर तिंतरवणी मार्गे विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग, नवगण राजुरी-खरवंडी राष्ट्रीय महामार्ग, तसेच बीड-शिरूरकासार-पाथडी राज्य मार्ग या तीन महत्त्वाच्या मार्गांना थेट जोड मिळणार आहे यामुळे संबंधित पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्र्याकडे या रस्त्या संदर्भात मागणी केली त्यामुळे या परिसराला अनन्य साधारण महत्व येणार आहे परंतु मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले तरी संबंधित पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्र्याकडे सतत पाठपुरावा चालवला पाहिजे अन्यथा आश्वासनाचा काही खरं नसतं असे मत नागरिकांनी व्यक्त केले.

## चौसाळामधून डॉ.जोगदंड यांनी निवडणूक लढवावी

मांजरसुंबा दि ६ (प्रतिनिधी ) बीड तालुक्यातील चौसाळा जिल्हा परिषद गटात लोकनेते डॉ.बाबुराव जोगदंड यांच्या नावाची जोरदार चर्चा असुन चौसाळा जिल्हा परिषद निवडणुक लढवावी म्हणून गावोगावी,वाडी वस्तीवरील कार्यकर्ते कामाला लागले आहेत. एक उच्च शिक्षित,अभ्यासु व समाजसेवेची जाण असणारे व्यक्तिमत्व म्हणून डॉ.जोगदंड यांनी चौसाळा जिल्हा परिषद निवडनुकीच्या मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला असल्याचे सांगण्यात येते.

गोरगरीब लोकाना सढळ हाताने मदत करणारे प्रत्येक व्यक्तीच्या सुख दुखात सामील होणारे समाजकारणामध्ये सक्रिय सहभाग असलेले व डॉ.जोगदंड यांच्या पाठिशी सर्वसामान्य जनतेची मोठी ताकत असुन अनेक गावातील विकासकामे मार्गी लावलेली आहेत. त्यामुळे डॉ. जोगदंड. हे सर्वतोपरीचीत आहेत.तसेच या भागातील समस्या डॉ. जोगदंड यांनी कोणतेही पद नसताना निस्वार्थपणे सोडवल्या आहेत. त्यांच्याकडे युवकांची लोकप्रियता कायम असल्याने त्यांनी चौसाळा जिल्हा परिषदेची निवडणुक लढवावी अशी मागणी सर्वसामान्य मतदारातुन होत आहे.



बीड -गुरुनानक जयंती निमित्त योगेश क्षीरसागर यांनी गुरुनानक मंदिरास भेट दिली असता त्यांचा सत्कार करून प्रसाद देताना डॉ .मदन जेसवाणी, दीपक आहुजा, सौ शीतल कुकडेजा,आनंद कुकडे, हितेश आसवानी व सिंधी पंजाबी समाज.

## फौजदार बदने पोलीस सेवेतून बडतर्फ

बीड दि ६(प्रतिनिधी)- फलटण उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर तरुणीच्या आत्महत्येच्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेला निलंबित उपनिरीक्षक गोपाळ बाळासाहेब बदने याला पोलीस खात्यातून बडतर्फ करण्यात आलं आहे.

कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी हा आदेश काढला आहे.बीड जिल्ह्याची कन्या असलेल्या व फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत डॉक्टर तरुणीने २३ ऑक्टोबर रोजी आत्महत्या केली होती. या तरुणीने आपल्या तळहातावर सुसाईड नोट लिहिली होती. उपनिरीक्षक गोपाल बदने याने चार वेळा अत्याचार केला आणि प्रशांत बनकर याने माझा शारीरिक व मानसिक छळ केला, असं तरुणीने नमूद केलं होतं. या घटनेमुळे संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाली होती.मृत तरुणीच्या कुटुंबीयांनी असा आरोप केला की, पोलिसांकडून अटक करण्यात आलेल्या आरोपींना 'फिट-अनफिट' दाखवण्यासाठी आणि मृतांचे शवविच्छेदन अहवाल बदलण्यासाठी डॉक्टर तरुणीवर दबाव टाकला जात होता. या प्रकरणी मुख्य संशयित उपनिरीक्षक गोपाल बदने याला आधी निलंबित करण्यात आले होते.

आता त्याला पोलीस सेवेतून कायमचं काढून टाकण्यात आलं आहे.साताराचे पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी या संदर्भात माहिती दिली. त्यांनी सांगितलं की, फलटण शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गु. र.नं. ३४५/२०२५ या गुन्ह्यातील आरोपी गोपाळ बाळासाहेब बदने याने पोलीस दलाचे ज्ञान असूनही बेफिकिरीने, नैतिक अध:पतन, दुर्वर्तन आणि पदाचा गैरवापर केला. तसंच समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण करणारी वर्तणूक केली. त्याचे कृत्य पोलीस उपनिरीक्षक पदाला अशोभनीय होते. त्याने कर्तव्य पालनात आणि दैनंदिन जीवनात संशयास्पद वर्तन केलं. त्याचे कृत्य अत्यंत घृणास्पद आणि निंदनीय आहे. त्यामुळे गोपाळ बाळासाहेब बदने याला शासकीय सेवेत ठेवणे योग्य नाही, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

# घराच्या तटरक्षक भिंतीवरील ऐतिहासिक धारूर किल्ल्याच्या प्रतिकृतीचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण

किल्लेधारूर दि ६ (प्रतिनिधी )- येथील शिल्पकार ईश्वर उमाप यांच्या संकल्पनेने प्रतिकृतीतून ऐतिहासिक किल्ले धारूर येथील ऐतिहासिक किल्ल्याची प्रतिकृती आपल्या घराच्या तटरक्षक भिंतीवर आकर्षक रित्या उभारण्यात आली , त्या प्रतिकृतीचे अनावरण धारूर शहरातील मान्यवरांच्या हस्ते करून या शहराचे वैभव वाढवण्याचे काम शहरातील उद्योजक व माजी नगरसेवक राजूशेठ कोमटवार यांनी केले.

किल्ले धारूर शहराचे वैभव म्हणजे येतील ऐतिहासिक किल्ला यामुळे शहराची ओळख राज्यभरात आहे. या शहरात या किल्ल्याचे महत्त्व वाढवण्याच्या दृष्टीने धारूर येथील माजी नगरसेवक व उद्योजक राजू शेठ कोमटवार यांनी आपल्या घराच्या तटरक्षक भिंतीवर शहरातीलच राज्यभरात गाजलेला शिल्पकार ईश्वर उमाप यांच्या संकल्पनेतून व कलाकृतीतून उत्कृष्टरित्या धारूर किल्ल्याचे ड्रेन द्वारे दिसणारे पूर्ण चित्र उभे केले व किल्ल्यातील प्रत्येक भाग या कलाकृतीत दाखवला राजू शेठ कोमटवार यांना येथील ऐतिहासिक किल्ल्याबद्दल आवड असल्याने आपल्या घरावर इतर कुठली कलाकृती असण्यापेक्षा किल्ल्याच्या प्रवेशद्वाराच्या बाजूला ही उत्कृष्ट कलाकृती तयार करून या किल्ल्याचे वैभव वाढवण्याचे काम केले या कलाकृतीचे अनावरण मान्यवराचे हस्ते करून हे कलाकृती शिल्प साकारारा ईश्वर उमाप यांचा सत्कार या प्रसंगी करण्यात आला. या कलाकृतीचे सर्वांनी कौतूक केले.या वेळी धारूर शहराचे माजी नगराध्यक्ष डॉ स्वरूपसिंह हजारी, माजी नगराध्यक्ष अर्जुनराव गायकवाड, उद्योजक माधवराव निर्मळ, धारूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बालासाहेब जाधव, आर्य वैश्य समाजाचे अध्यक्ष कृष्णा भावठाणकर, उद्योजक परमानंद तोष्णीवाल, उद्योजक तुकाराम शिनगारे, अक्रम जरगर, जितेंद्र महामुनी, अनंता काळे, माजी उपनगराध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, पत्रकार अनिल महाजन, अँड मोहन भोसले, साईनाथ कोमटवार रामभाऊ फुके, बालाजी क्षिरसागर आदींच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले या कलाकृतीच्या उत्कृष्टउत्कृष्ट निर्मितीने या कलाकृतीचे महत्त्व वाढणारा सून राजू शेठ कोमटवार यांच्या या संकल्पनेचे सर्वत्र कौतुकही होत आहे.

## राष्ट्रवादी भवन ते लेंडी नाला रस्ता प्रस्ताव प्रलंबित ;नागरिकांचा आंदोलनाचा इशारा

बीड दि ६ (प्रतिनिधी)-- बीड शहरातील शहेनशहा नगर परिसरातील राष्ट्रवादी भवन ते लेंडी नाला (अक्सा मशीद परिसर) हा मुख्य रस्ता पूर्णपणे उद्ध्वस्त झाला असून, नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकामाचे काम बीड नगरपरिषदेकडून प्रस्तावित करण्यात आले असून, २९ ऑगस्ट २०२५ पासून संबंधित प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात प्रलंबित आहे. तेव्हा सदर नाला व रस्त्याचे काम त्वरित करावे अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे.

या रस्त्यावर पडलेले खोल खड्डे, साचलेले पाणी आणि तुटलेल्या नाल्यांमुळे शाळकरी विद्यार्थी, रुग्ण, वृद्ध आणि महिलांना दररोज हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. या विषयावर १५ ऑगस्ट रोजी सामाजिक कार्यकर्ते मिलिंद भास्कर सरपते यांच्या नेतृत्वाखाली ''बेशरम आंदोलन'' करण्यात आले होते. तरीही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.तरी १५ दिवसांत कार्यवाही झाली नाही, तर १९ नोव्हेंबर रोजी नागरिकांच्या वतीने 'अजित दादा विवेक जॉन्सन के नाम पे दे दे बाबा या नावाखाली जनभिक्षा आंदोलन' राबविण्यात येईल. असा इशारा मिलिंद भास्कर सरपते यांनी दिला आहे.

## टोकेवाडी येथील मल्हारी दराडे यांचे निधन

वडवणी दि ६( प्रतिनिधी)- वडवणी तालुक्यातील टोकेवाडी येथील मल्हारी सत्यपाल



दरडे यांचे गुरुवार दि ६ नोव्हेंबर रोजी दु:खद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८० वर्ष होते. ,शोकाकुल वातावरणात टोकेवाडी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आला.

याविषयी अधिक माहिती अशी की, गोरक्षनाथ कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक अनुरथ दराडे यांचे वडील मल्हारी दराडे यांचे आज वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले, त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करतेवेळी वडवणी तालुक्यातील सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी ,शिक्षक, ग्रामस्थ व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते, त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली,सुना , नातवंडे,असा मोठा परिवार आहे. या घटनेने दराडे कुटुंबावर कोसळलेल्या दु:खात पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

## शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांचा ताफा अडवून नुकसान भरपाईतल्या दुजाभावावर केला रोष



कडा दि ६ (प्रतिनिधी)- अतिवृष्टीने पिके उध्वस्त झाली, शेतकऱ्यांचे संसार उद्ध्वस्त झाले. पण शासनाची मदत मात्र अजूनही मार्गातच अडकली आहे ! दोन महिन्यांहून अधिक काळ उलटून गेला तरी हजारो शेतकरी अनुदानापासून वंचित असल्याने संतप्त शेतकऱ्यांनी अखेर बुधवारी जिल्हाधिकाऱ्यांचा ताफाच अडवला. आष्टी तालुक्यातील देवळाली आणि घाटा पिंपरी परिसरात झालेल्या अतिवृष्टीच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी सकाळी साडे अकरा वाजता केंद्रीय पथक आले होते. घाटा येथील पाहणी संपल्यानंतर पथक देवळालीत गेले. दरम्यान, बीडकडे परतत असलेले जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा ताफा माळीमळा येथे आल्यानंतर शेतकऱ्यांनी रस्ता रोखून धरला. ''नुकसानभरपाई देताना दुजाभाव का ? काहींना मदत, काहीं बेदखल का ?'' असा सवाल करत शेतकऱ्यांनी प्रशासनाला केला. जिल्हाधिकाऱ्यांना प्रश्नांचा भडिमार करत शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. या गोंधळात जिल्हाधिकारी काहीसे संतप्त झाल्याचे दिसून आले.दरम्यान, तहसीलदार वैशाली पाटील यांनी हस्तक्षेप करून परिस्थिती शांत केली. आम्ही नुकसानीची पाहणी करण्यासाठीच जात आहोत, असे सांगून त्यांनी शेतकऱ्यांची समजूत काढल्यानंतर ताफा पुढे रवाना झाला.

## पुढे रडायचं नसेल तर आता चारित्र्यसंपन्न सुशिक्षित तरूण उमेदवारांनाच मतदान करा-पाटील

बीड दि ६(प्रतिनिधी)-आगामी पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि नगरपालिका निवडणुका पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. तेव्हा पाच वर्ष रडायचं नसेल तर या निवडणुकांमध्ये मतदारांनी प्रस्थापित आणि भ्रष्टाचारात गुंतलेल्या उमेदवारांना नकार देऊन चारित्र्यसंपन्न, तरुण व सुशिक्षित उमेदवारांना संधी द्यावी, असे आवाहन स्वराज्य जनजागृती परिषदेचे सचिव तुषार पाटील यांनी केले आहे.

याबाबत प्रसिद्धीच दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, गेल्या काही काळात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भ्रष्टाचार, अनियमितता आणि जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष वाढल्याचे दिसून येते. त्यामुळे मतदारांनी स्वच्छ चरित्र, प्रामाणिकता आणि विकासाभिमुख दृष्टिकोन असलेल्या उमेदवारांना मतदान करावे, तसेच नंबर दोनचे धंदे करणारे, भ्रष्टाचारी, बेईमान आणि स्वार्थासाठी राजकारण करणारे उमेदवार यांना मतदान टाळावे, असे पाटील यांनी स्पष्ट केले.तसेच ही निवडणूक केवळ सत्तेसाठी नसून, आपल्या गाव-तालुक्याच्या विकासासाठीची खरी लढाई आहे. त्यामुळे 'पैसे घेऊन नाही तर विचार पाहून मतदान करा' हा मंत्र प्रत्येक मतदाराने स्विकारावा. मतदारांनी गोरगरिबांच्या आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाण असलेले, विकासासाठी झटणारे आणि स्वच्छ प्रतिमेचे उच्चशिक्षित उमेदवार निवडल्यास खऱ्या अर्थाने लोकशाही बळकट होईल, असेही पाटील यांनी शेवटी नमूद केले.

## स्वानंद सार्वजनिक वाचनालयात क्रांतिकारक फडके यांची जयंती साजरी

केज दि ६ (प्रतिनिधी)-केज तालुक्यातील आनंदगाव येथील स्वानंद सार्वजनिक वाचनालयात. क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्यासह गुरुनानक जयंती साजरी करण्यात आली.

या वाचनालयात चार नोव्हेंबर रोजी क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांची तर पाच नोव्हेंबर रोजी गुरुनानक जयंती साजरी करताना गावातील मान्यवर उपस्थित होते.यावेळी २३ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२५ या दरम्यान आयोजित दिवाळी अंक व नियतकालिके प्रदर्शनाचा समारोप करण्यात आला. समारोप कार्यक्रमाला माजीसरपंच रामराजे गायकवाड, अरुण गायकवाड, नारायण गायकवाड, संजय सोनवणे, एस. के. वैरागे, दादासाहेब गायकवाड, रविंद्र गायकवाड, ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांच्यासह वाचकांनी सहभाग घेतला. सर्व कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले. सर्वच कार्यक्रमात वाचकांचा सक्रीय सहभाग होता.

## राजसाहेब देशमुख यांच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवडीने राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला बळ मिळणार

अंबाजोगाई दि ६ (प्रतिनिधी)--जिल्ह्यातील कॉंग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख माकेगावकर यांची नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने महाराष्ट्र उपाध्यक्षपदी निवड केल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाला बीड जिल्ह्यात मोठी उभारी मिळणार असल्याचे राजकारणी मधून अनुमान काढले जात आहे.राजेसाहेब देशमुख यांनी यापूर्वी जिल्हा परिषदेच्या सभापती, कॉंग्रेस पक्षाचे बीड जिल्हा अध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. पक्षाचा सघटनात्मक बाधणा उत्तमारत्याकरून पक्ष मजबूत करण्यासाठी सर्वशक्तीनिशी योगदान द्याल,''असा विश्वास नियुक्ती पत्रात व्यक्त करण्यात आला आहे.तसेच, ''समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन पक्षाची ध्येय-धोरणे तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय पद्मविभूषण खा. शरदचंद्रजी पवार यांचे विचार सर्वदूर पोहोचविण्यासाठी'' त्यांनी प्रयत्नशील राहावे, असेही पत्रात नमूद केले आहे. या नियुक्तीमुळे मराठवाड्यात, विशेषत: बीड जिल्ह्यात पक्षाला बळ देण्याचा राष्ट्रवादी शरद पवार गटाचा प्रयत्न असल्याचे दिसून येत आहे.

## आकाश लांडगे यांच्या दु:खद निधनानंतर केजमध्ये तरुणांनी घेतला डीजे संस्कृतीला बाय-बायचा निर्णय

केज दि ६ (प्रतिनिधी) डीजे/डॉल्बीच्या कर्कश आवाजामुळे हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन शहरातील समर्थ नगर मधील रहिवाशी आकाश संतोष लांडगे या २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना नुकतीच घडली. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत असताना, केज शहरातील भाऊ झालेल्या युवकांनी आकाश लांडगे यांच्या श्रद्धांजली सभेत पुढील काळात केज शहरात कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमात डीजे/डॉल्बी न लावण्याचा सामूहिक निर्धार व्यक्त केला.

ध्वनी प्रदूषणामुळे आरोग्यावर होणाऱ्या गंभीर परिणामांचा विचार करून घेतलेला हा निर्णय अत्यंत कौतुकास्पद असल्याची भावना व्यक्त होत आहे. मान्यवरांनी केला संकल्पाचा गौरव या श्रद्धांजली कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. गटनेते डॉ. हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा डॉ. सौ. सिताताई बनसोड, ह.भ.प. बाळासाहेब गेंधले महाराज, माजी नगरसेवक शिवाजी आप्पा हजारे, हनुमंत भोसले सर, भाई मोहन गुंड, रणजित खोडसे,अशोक सोनवणे, विजय आरकडे, लक्ष्मण जाधव, धनंजय घोळवे, संजय कोरडे, विजय वनवे, विजय आंडिल, सुलेमान काजी, कवी गायकवाड, शिवाजी घुले साहेब, पंकज तेलंग, राजेभाऊ कुचेकर, अभी लोखंडे आदी मान्यवरांनी उपस्थिती दर्शवून आकाश ला श्रद्धांजली वाहिली. युवकांनी घेतलेल्या डीजेबंदी संकल्पाला सर्व मान्यवरांनी पूर्ण पाठिंबा दर्शवला आणि या निर्णयाचे भरभरून कौतुक केले. सामाजिक संदेशाचा नवा ध्वनी एका निष्पाप तरुणाच्या निधनाने समाजासमोर ध्वनीप्रदूषण आणि हृदयविकाराचा गंभीर मुद्दा अधोरेखित झाला आहे. केजच्या युवकांनी घेतलेला हा निर्णय इतर शहरांसाठीही एक प्रेरणादायी आदर्श ठरू शकतो.

# संपादकीय

## विद्यार्थी दिन

७ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण राज्यात विद्यार्थी दिन साजरा केला जातो. याच दिवशी म्हणजे ७ नोव्हेंबर १९०० साली विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतापसिंग हायस्कूल, राजवाडा चौक जिल्हा सातारा येथे शाळेत प्रवेश घेतला होता. त्यावेळी शाळेत भिवा म्हणून त्यांच्या नावाची नोंद करण्यात आली होती. या शाळेतील जनरल रजिस्टरमध्ये १९१४ या क्रमांकासमोर त्यांच्या नावाची नोंदणी व त्यासमोरील स्वाक्षरी ही ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून आजही शाळा प्रशासनाने जपून ठेवली आहे. या शाळेत ते १९०४ सालापर्यंत म्हणजे चौथी पर्यंत शिकले. ई स २००३ पासून पत्रकार अरुण जावळे हे हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा व्हावा यासाठी प्रयत्न करीत होते. २०१७ मध्ये बाबासाहेबांच्या शाळा प्रवेशाचे स्मरण म्हणून तसेच विद्यार्थ्यांना शिक्षण हेच उन्नतीचे एकमेव साधन असून त्याच्या परिश्रमाची जाण व्हावी यासाठी महाराष्ट्र सरकारने हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या दिवशी राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध पैलूंवर निबंध, वक्तृत्व, काव्य वाचन स्पर्धा आयोजित केल्या जातात. यावर्षी कोरोना आणि दिवाळी यामुळे शाळा, महाविद्यालये बंद असली तरी या स्पर्धा ऑनलाइन आयोजित केल्या जाणार आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश खऱ्या अर्थाने शैक्षणिक क्रांतीची आणि युगाची चाहूल म्हटली पाहिजे. कारण डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे पाऊल शाळेत पडल्यामुळे ते स्वतः सुशिक्षित आणि प्रज्ञावंत झाले आणि करोडो दलितांचे आणि वंचितांचे उध्दारकर्तेही झाले. विशेष म्हणजे ज्या संविधानाचा आज सर्वात आदर्श संविधान म्हणून देशभर गौरव होत असतो त्या भारतीय संविधानाचे ते शिल्पकारही ठरले. परिणामतः भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मानवी मूल्ये रुजू शकली गेली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा शाळा प्रवेश दिन ही अत्यंत महत्वाची आणि इतिहासाला कूस बदलायला लावणारी घटना आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे आजीवन विद्यार्थी होते त्यांनी आपला विद्याव्यासंग शेवटपर्यंत जपला. आजचा विद्यार्थी हा या देशाचे भविष्य आहे. त्यामुळे आदर्श विद्यार्थी निर्माण होणे ही काळाची गरज आहे. जर देशात आदर्श विद्यार्थी निर्माण झाले तर आपल्या देशाला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. या ऐतिहासिक दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन! तसेच सर्व विद्यार्थी मित्रांना विद्यार्थी दिनाच्या हार्दीक शुभेच्छा!

## बीड पंचायत समितीवर कमळ फुलवणार –अशोक रसाळ

बीड दि ६ (प्रतिनिधी)- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने काही दिवसातच जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक तारकाही जाहीर होतील बीड भारतीय जनता पार्टीमध्ये ना.मंत्री पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉ.प्रीतमताई मुंडे यांच्या नेतृत्वात भाजप जिल्हाध्यक्ष शंकर भाऊ देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली बीड पंचायत समितीवर भगवा फडकण्याचा निर्धार बीड तालुक्यातील भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. त्या अनुषंगाने बीड तालुक्यात येणाऱ्या पंचायत समिती व जिल्हा परिषद गणासाठी इच्छुक निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत,बीड



भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागून येणाऱ्या काळात सर्वसामान्यांची कामे जी अनेक वर्षापासून पंचायत समिती ताब्यात नसल्याने होत नाही आहेत ती कामे पूर्ण करण्यासाठी ताकतीने बीड तालुक्याची पंचायत समिती व बीड तालुक्यातील जिल्हा परिषद लढवणार असून विजय खेचून आणणार असल्याचा निर्धार बीड तालुक्यातील भाजपच्या कार्यकर्त्यांनी ना पंकजाताई व मा.खा.डॉ प्रीतम ताई यांच्या निष्ठावंतांनी व्यक्त केला आहे,असे भाजप तालुकाध्यक्ष अशोक रसाळ यांनी केला आहे.

## कपिलधारवाडीच्यापुनर्वसन मागणीचे अनिल जगताप यांचे उपमुख्यमंत्री शिंदे यांना निवेदन

बीड दि ६ (प्रतिनिधी) - तालुक्यातील कपिलधारवाडी येथे अलीकडे झालेल्या भूस्खलनामुळे स्थानिक नागरिकांचे मोठे नुकसान झाले असून परिसरातील जमिनीत भेगा पडल्यामुळे तेथील घरांना आणि नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला . या पार्श्वभूमीवर शिवसेना बीड जिल्हा प्मुख अनिल जगताप यांनी दि. ५ नोव्हेंबर २०२५रोजी मुक्तागिरी निवास, मुंबई येथे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांना निवेदन सादर केले.

या निवेदनात कपिलधारवाडी येथील भूस्खलनग्रस्त नागरिकांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनाची मागणी करण्यात आली. अनिलदादांनी निवेदनासोबत भूस्खलनग्रस्त ठिकाणांचे प्रत्यक्ष फोटो आणि सविस्तर माहिती सादर करत, प्रभावित नागरिकांना तातडीने सुरक्षित स्थळी हलविणे, पुनर्वसनासाठी ठोस योजना तयार करणे आणि भविष्यात अशा आपत्तींपासून बचावासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याची मागणी केली. या निवेदनावर प्रतिसाद देताना उपमुख्यमंत्री शिंदे साहेब यांनी, कपिलधारवाडीतील लोकांची समस्या सोडवण्यासाठी शासन पातळीवर तातडीने ठोस पावले उचलली जातील, असे आश्वासन दिले. या प्रसंगी शिवसेना संपर्क नेते अर्जुनजी खोतकर साहेब आणि शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन उपस्थित होते.

## आपची नगरपरिषद निवडणुकीसाठी जोरदार तयारी–अशोक येडे

बीड दि ६ (प्रतिनिधी) - आम आदमी पार्टीने बीड जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुका स्वबळावर लढण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. पक्षाने नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी इच्छुक उमेदवारांना संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. त्या अनुषंगाने आम आदमी पार्टीची नगरपरिषद निवडणूक लढवण्याची जोरदार तयारी सुरू असल्याचे पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे यांनी प्रसिध्दी पत्रकात नमूद केले



या संदर्भात माजी सैनिक अशोक येडे, जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी - बीड यांनी माहिती देताना सांगितले की, आम आदमी पार्टी महाराष्ट्रातील सर्व निवडणुका स्वबळावर आणि स्वातंत्र्याने लढणार आहे. तसेच पत्रकार नमूद केले की नगरपरिषद निवडणुकीत आम आदमी पार्टीच्या तिकिटावर उमेदवारी दाखल करण्याची इच्छा असलेल्या कार्यकर्त्यांनी, तरुणांनी आणि नवयुवकांनी तात्काळ संपर्क: ९४०५४५८७२१, ९७ ६७ ८१ ५७ २७, ९४ २२५९ १८ ०९ या नंबर वर आपण संपर्क करू शकता.एकत्र येऊ, स्वच्छ राजकारण घडवू - आम आदमी पार्टी जनतेचा आवाज! असे आवाहन माजी सैनिक अशोक येडे यांनी केले आहे.

## लॉन टेनिस व सॉफ्ट टेनिस स्पर्धा उत्साहात संपन्न कृष्णा डोंगरेचा जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक



बीड दि ६ (प्रतिनिधी)– महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा लॉन टेनिस व सॉफ्ट टेनिस असोसिएशन बीड यांच्या सहकार्याने आयोजित जिल्हास्तरीय लॉन टेनिस व सॉफ्ट टेनिस या दोन्ही स्पर्धा अतिशय उत्साहाच्या वातावरणात पार पडल्या.या दोन्हीही स्पर्धेत मातोश्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आदर्शगाव वंजारवाडी येथील कु. तृष्णा विजय डोंगरे हिने उत्तम कामगिरी करून जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळविला आहे.तिच्या या यशाबद्दल विद्यालयाचे सचिव ॲड. सर्जेराव तात्या तांदळे, लक्ष्मणराव पवार, विका, समर्थ, दिनकर तांदळे, विद्यालयाचे मुख्याध्यापक नागरगोजे सर, तसेच पांडुरंग नाना राख, सोमिनाथ तांदळे, जगनाथ तांदळे, महादेव कुटे, अंगद तांदळे, बाबासाहेब तांदळे, भास्कर तांदळे, दयावान सर, अमर सानप, विशाल खाडे, महादेव कुर्लेकर, सचिन तिपटे, भुतकर सर, शहादेव तांदळे, दिलीप खाडे, अंकुश तांदळे, अशोक धुरंधरे, नंदु पवळ, सुग्रिव तांदळे, अंकुश खाडे, नामदेव कुटे, तात्याराम बाप्पु, नागनाथ सातपुते, वैभव तांदळे, अशोक काळे, विठ्ठल तांदळे, ओमकार कांबळे यांनी तिचे आणि क्रीडा शिक्षक विजय डोंगरे सर यांचे अभिनंदन करून पुढील विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी जाधव सर, आंधळे सर, घरत सर, गायकवाड सर, शेजुळ मॅडम, तांदळे सर, बेग सर, बिनवडे सर, हानुमंत दादा तांदळे, प्रदीप बाप्पु तांदळे, वाघमारे डि.डि., लक्ष्मण शेंडगे तसेच अनेक विद्यार्थी उपस्थित होते.

## आसेफभाऊ शेख प्रभाग १३ चा प्रभावी चेहरा रेहाना शेखच्या उमेदवारीला प्रभागात पसंती

माजलगाव दि ६(प्रतिनिधी)- समाजसेवक आसेफभाऊ शेख माजलगाव परिसरात सर्व परिचित आहेत.तर



नगरपरिषद निवडणूकित प्रभाग १३ हा महिला राखीव असल्याने या जागेवर त्यांच्या आई रेहाना हारून शेख यांच्या उमेदवारीला नागरिकांकडून पसंती मिळत आहे.प्रभाग १३ मध्ये नगरपरिषद निवडणुकीची चुरस निर्माण झाली आहे. परंतु या प्रभागात येतील समाजसेवक यांच्या प्रतिनिधी म्हणून त्यांच्या आई रेहाना हरुण शेख यांच्या नावाला उमेदवार म्हणून लोकांकडून स्विकारल जात आहे.कुठलीही प्रसिद्धी न करता 'कोरोना काळात' आसेफ शेख याने गरिबांसाठी घेतलेली भूमिका ही कौतुकास्पदच होती.कोरोना काळात गरिबांना आसेफ शेख याचा आधार मोलाचा ठरला आहे. गोरगरिबांच्या सुखा दुखात पाठीशी उभा राहणारा हक्काचा आधार म्हणून आसेफ शेखकडे पाहिल्या जातं.शहरात साजऱ्या होणाऱ्या विविध महापुरुषांच्या जयंत्या, उत्सव, यातही 'आसेफ'चा सहभाग राहिला आहे. परिसरातील गरीब विद्यार्थी,कष्टकऱ्यांनाही त्याचा मदतीचा हात नेहमीच दिसून येतो. कोणाच्या लग्नकार्यात,कोणाच्या दवाखान्याच्या कामालाही धावून जाणारा हा युवक असल्याने त्या नगरपरिषद निवडणुकीत त्यांचे प्रतिनिधी करणाऱ्या आई रेहाना हारुन शेख यांना प्रभागातील नागरिकांनी नगरसेवक करण्याचा संकल्प केला आहे.त्यामुळे आसेफभाऊ शेख प्रभाग १३ महिला ओपनचा प्रतिनिधित्व करणारा प्रभावी चेहरा ठरत आहे.

त्यामुळे प्रभागातील २४ तास सेवेची पावती म्हणून नागरिकांनी त्यांच्या आईच्या उमेदवारीस पसंती दिली आहे.

## बहुजन मुक्ती पार्टीच्या बीड लोकसभा प्रभारीपदी किरण चव्हाण यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत

बीड दि. ६(प्रतिनिधी)- आगामी होत असलेल्या स्थानिक



स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये बहुजन मुक्ती पार्टी ही बीड जिल्ह्यातील होत असलेल्या सर्व नगरपालिका पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये बहुजन मुक्ती पार्टी आपले उमेदवार उतरवणार असून या निवडणुकीची जबाबदारी किरण चव्हाण यांच्याकडे देण्यात आली आहे. त्यांची बहुजन मुक्ती पार्टीच्या बीड लोकसभा वरील पदी निवड करण्यात आले असल्याने त्यांचे सर्वत्र स्वागत होत आहे. समाज सेवेमध्ये असलेले ओबीसी क्रांती परिषदेच्या माध्यमातून समाजातील तळागाळातील लोकांच्या मदतीला धावून जाणारे, विविध प्रादेशिक व राष्ट्रीय पक्षाचे पदे भूषवलेले नेतृत्व म्हणून किरण चव्हाण यांची समाजात ओळख आहे. २०३० च्या लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने तसेच फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जपणारा महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी, शोषित पीडित वंचित समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी सध्या होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका फार महत्त्वाच्याअसून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन जी मेश्राम यांचे विचार तळागाळात पोहोचवण्यासाठी पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रताप दादा पाटील यांच्या आदेशाने ही निवड करण्यात आली.सर्व निवडणुका ताकदीने लढणार असल्याचे मत बहुजन मुक्ती पार्टीचे युवा प्रकोष्ट प्रदेशाध्यक्ष दीपक भाऊ शिंदे यांनी व्यक्त केले.

## माजलगावात सार्वजनिक गणेश मंडळाचे रविवारी आ.सोळंके यांच्या हस्ते बक्षिस वितरण

माजलगाव, दि ६(प्रतिनिधी): शहरामत गणेशोत्सव काळात आमदार प्रकाश सोळंके यांच्या वतीने गणेश मंडळांसाठी व ईतर खेळाडूसाठी विवीध स्पर्धा आयोजित केल्या होत्या. त्या स्पर्धांचे बक्षीस वितरण दि. ९ रविवारी सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास आमदार प्रकाश सोळंके, लोकनेते सुंदरराव सोळंके साखर कारखाना उपाध्यक्ष जयसिंह सोळंके, प्रकाश आनंदगांवकर, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, सुरेंद्र रेदासणी यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमात सर्व गणेश मंडळांनी व स्पर्धेत बक्षीस मिळालेल्या व्यक्तीने हजर रहावे असे आवाहन उत्सव समितीच्या वतीने अच्युत लाटे, सभापती जयदत्त नरवडे, संभाजी शेजुळ, चंद्रकांत शेजुळ यांनी केले आहे.



## राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत नांदूर हवेली येथील पूरग्रस्तांना किराणा साहित्याचे वाटप

बीड दि.६(प्रतिनिधी)-राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध महाविद्यालयांच्या स्वयंसेवकांनी संकलित केलेले किराणा साहित्य व दैनंदिन वापरातील अत्यावश्यक वस्तूंच्या किटचे बीड तालुक्यातील नांदूर हवेली येथील पूरग्रस्त कुटुंबांना वाटप करण्यात आले.या उपक्रमामध्ये श्री बंकटस्वामी महाविद्यालय बीड, स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय बीड, मिलीया महाविद्यालय बीड, महिला महाविद्यालय बीड तसेच जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवकांनी या अभियानासाठी योगदान दिले.

पूरग्रस्त भागातील परिस्थितीचे सर्वेक्षण करून प्रत्यक्षात ज्या कुटुंबांना अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका बसला आहे, अशा ४५ कुटुंबांची निवड करून त्यांना किराणा साहित्याचे किट देण्यात आले.

या कार्यक्रमास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. सोमीनाथ खाडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी ग्रामस्थांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजना बीड जिल्हा समन्वयक डॉ.अरुण दैतकार तसेच श्री बंकटस्वामी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. मनोजकुमार नवसे,डॉ.शंकर शिवशेट्टे, प्रा. राजाभाऊ नागरगोजे, डॉ.सुनील त्रिभुवन, डॉ.जगन्नाथ चव्हाण तसेच हिंगणी ग्रामपंचायतीचे सदस्य शिवनाथ बुधनर, सामाजिक कार्यकर्ते शेख अयुब,प्रेमनाथ धांडे व हिरापूर येथील विलास साहेबराव वडमारे उपस्थित होते.राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक विद्यार्थी सुरज गायकवाड व सहकाऱ्यांनी या कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. यावेळी पूरग्रस्त नागरिकांनी आभार व्यक्त केले

## गोविंदपंतांच्या समाधी परिसरातील अतिक्रमण तात्काळ काढा नसता गंभीर परिणाम होतील–सचिन मुळूक

### जिल्हाधिकारी,पोलीस अधीक्षक,न.प.मुख्याधिकारी यांना दिले निवेदन

बीड दि ६ (प्रतिनिधी) - शहरातील जैन भवन



परिसरातील बिंदुसरा नदीकाठी असलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज व संत मुक्ताई यांचे आजोबा गोविंदपंत यांच्या समाधी परिसरावर अतिक्रमणाचा विळखा बसला असून, त्यामुळे वारकरी आणि हिंदू समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. या प्रकरणी तात्काळ कारवाई करुन अतिक्रमण हटवावे, अन्यथा आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल, असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी दिला आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी, नगरपरिषद मुख्याधिकारी आणि पोलिस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले आहे.

बीड शहरातील गोविंदपंतांची समाधी हे वारकरी संप्रदायाचे अतिशय पवित्र स्थळ आहे. संत मुक्ताईंच्या जीवनाशी या स्थळाचा थेट भावनिक संबंध आहे. दरवर्षी आषाढी वारीच्या काळात संत मुक्ताईंची पालखी बीडमध्ये येते आणि या ठिकाणी आजोबा-नातीच्या भेटीचा पारंपरिक सोहळा पार पडतो. मुक्ताईंची पालखी गोविंदपंतांच्या समाधीस्थळी काही काळ विसावते, त्यामुळे हे स्थळ धार्मिक तसेच सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे.मात्र, अलीकडच्या काळात गोविंदपंतांच्या समाधी परिसरातील सुमारे १२०० चौ.मी. क्षेत्रावर बेकायदेशीर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे. काही जणांनी या ठिकाणी बांधकामे करून परिसराची पवित्रता भंग केली असून, वारकरी व भक्त वर्गात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. सदरील ठिकाण संत परंपरेचे जिवंत प्रतीक आहे. येथे झालेल्या अतिक्रमणामुळे संत परंपरेचा अपमान झाला आहे. जिल्हा प्रशासनाने अतिक्रमणधारकांवर ठोस कारवाई करून समाधी परिसर मूळ स्वरूपात आणावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केली आहे.

बीड- थंडीचा जोर वाढल्याने कपाटात ठेवलेले स्वेटर, मफलर बाहेर काढले जात असुन थंडीपासुन स्वत:चा बचाव करण्यासाठी या कपड्यांचा वापर नागरीक करतांना दिसुन येत आहे.

## बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे खुला गट निवड चाचणी स्पर्धा संपन्न

बीड दि ६ (प्रतिनिधी):शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने खुल्या गटातील २०-२० क्रिकेट निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले. या निवड चाचणी स्पर्धेत जिल्ह्यातील अनेक युवा क्रिकेटपटूंनी उत्साहाने सहभाग घेतला.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. योगेश क्षीरसागर उपस्थित होते. त्यांनी खेळाडूंना उत्तम खेळासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच असोसिएशनचे सचिव आमेर सलीम यांनी खेळाडूंना शिस्त, मेहनत आणि नियमित सरावाचे महत्त्व पटवून दिले.या प्रसंगी नगरसेवक शुभम धुत, संजय उढाण, जिल्हा क्रिकेट प्रतिनिधी राजन साळवी, ज्येष्ठ पत्रकार ड. महेश वाघमारे, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, संजय धस, पत्रकार आनंद वीर, गोपाल गुरखुडे, शेख आरिफ, अतीक कुरेशी, सरफराज मोमीन, अक्षय नरवडे व शाहरुख पठाण आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात बीड जिल्ह्यातील अनेक युवा क्रिकेटपटूंनी आपल्या खेळकौशल्याचे प्रदर्शन केले. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील नवोदित क्रिकेटपटूंना पुढे जाण्याची मोठी संधी मिळाल्याचे उपस्थितांनी सांगितले.

## सिरसाळा येथे आज होणार शेतकरी संवाद मेळावा

परळी वै. दि ६ (प्रतिनिधी) -ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांच्या प्रेरणा आणि संकल्पनेतून दि. ७ नोव्हेंबर रोजी सिरसाळा येथे भव्य शेतकरी संवाद मेळावा संपन्न होत आहे. या कार्यक्रमास देशाचे कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, पशुसंवर्धन तथा दुग्धविकास मंत्री पंकजाताई मुंडे, खा.बजरंग सोनवणे, खा.रजनीताई पाटील, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्यासह मराठवाड्यातील सर्व आमदारांसह अनेक मान्यवर उपस्थित असणार आहे. सदरील कार्यक्रमास राज्यातील ३५ ते ४० हजार शेतकरी उपस्थित राहणार आहेत. शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा मेळावा अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक असा ठरणार आहे. केळी लागवडीसाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून शंभर कोटी, तुती लागवड करण्यासाठी शंभर कोटी तर फळबाग लागवडीसाठी शंभर कोटी रुपयांची मदत आर्थिक संस्थेच्या मार्फत शेतकऱ्यांना करण्याची घोषणा केली जाणार आहे. पारंपरिक शेती ही शेतकऱ्यांना न परवडणारी झाली आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण, शासन, प्रशासन आणि शेतकऱ्यांत सुसंवाद घडवणे तसेच आधुनिक शाश्वत शेतीसाठी भविष्यकालीन ठोस उपाययोजनांचा ऊहापोह या मेळाव्यात केला जाणार असल्याने हा शेतकरी संवाद मेळावा अभूतपूर्व ठरणार असून, या ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार होण्यासाठी हजारोंच्या संख्येने शेतकरी बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## जयदत्त धस व सागर धस यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

शिरूर कासार (प्रतिनिधी):- शहरातील माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी पवार यांच्या निवासस्थानी तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीमध्ये युवा नेते जयदत्त भैय्या धस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी सकाळपासून रीघ लागली होती.पूर परिस्थिती लक्षात घेता माजी मंत्री तथा आमदार सुरेश अण्णा धस यांनी चिरंजीव जयदत्त व सागर यांचा वाढदिवस हा सामाजिक उपक्रमांने साजरा करावा असा मानस व्यक्त केल्या नंतर जयदत्त भैय्या धस यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले शुभेच्छा देताना हार तुरे न देता पुस्तके व शालेय साहित्य भेट म्हणून देण्याचे



आवाहन केले होते.त्याचेच औचित्य साधून कार्यकर्ते विविध प्रकारची पुस्तके व विद्यार्थ्यांना गरजेचे साहित्य घेऊन आले होते. उकंडा चकला येथील शाळेत विद्यार्थ्यांना वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट व खाऊ देऊन साजरा करण्यात आला यावेळी उपस्थित शिवाजी पवार,कल्याण काका तांबे,विनोद काकडे,उद्धव बापू खेडेकर,अरुण भालेराव,गणेश तळेकर,महेश निंबाळकर,लहू जेधे,प्रताप काठखडे,अजय कुचेरिया,सागर काटे,गणेश पवार,आसाराम माने सह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## राज्यस्तर शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेचा बक्षीस वितरण

बीड, दि. ०६ (जिमाका):- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अंतर्गत धिनस्त जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांचे विद्यमाने व जिल्हा राज्य व्हॉलीबॉल संघटनेच्या तांत्रिक सहकार्याने दिनांक ०१ ते ०२ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, इनडोअर हॉल, बीड येथे मान्यवरांच्या उपस्थितीत १७ वर्षाखालील मुले व मुली राज्यस्तर शालेय व्हॉलिबॉल स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न झाला.

## रोटरी आणि आर्यवैश्य महासभेतर्फे शनिवारी

# मोफत इलेक्ट्रॉनिक हात वाटप शिबिर

**बीड (प्रतिनिधी) : मानवतेच्या सेवेसाठी आणि अपंगत्वावर मात करण्यासाठी बीडमध्ये एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहे. रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन, आर्य वैश्य महासभा जिल्हा बीड, इनाली फाउंडेशन पुणे आणि रोटरी क्लब ऑफ पुणे डाउनटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने बॅटरीवर चालणारा इलेक्ट्रॉनिक प्रॉस्थेटिक हात मोफत देण्याचे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.**

सदरील शिबिर दि. ८ व ९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत बीड शहरातील जीवनज्योत हॉस्पिटल येथे पार पडणार आहे.

या शिबिरात अपंगत्वामुळे हात गमावलेल्या व्यक्तींना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित इलेक्ट्रॉनिक हात मोफत बसवून दिले जाणार आहेत. हा हात पूर्णतः मोफत असून, शस्त्रक्रियेची आवश्यकता नाही. तो वापरण्यास हलका, आकर्षक व दैनंदिन जीवनातील कामांसाठी उपयुक्त आहे. त्यामुळे अशा व्यक्तींना नव्याने आत्मविश्वास व स्वावलंबन प्राप्त होणार आहे.

सदरील शिबिराचे उद्घाटन डिस्ट्रिक्ट लर्निंग फेलीसीटेटर पीडीजी ओम मोतीपवळे, महाराष्ट्र राज्य आर्यवैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार, इनाली फौंडेशनच्या प्राजक्ता कुंभार, रोटरी क्लब ऑफ पूना डाउन टाउनचे प्रदीप मुनोत आणि डीडीआरसी अंतर्गत महात्मा गांधी सेवा संघच्या दीपिका शेरखाने यांच्या उपस्थितीत तर समारोप समारंभ डीजी एलेक्ट जयेशभाई पटेल यांची उपस्थितीत संपन्न होणार आहे.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन चे अध्यक्ष रो. इंजि. राहुल बोरा, सचिव रो. प्रो. डॉ. प्रकाश कोंका, बीड जिल्हा आर्यवैश्य महासभेचे अध्यक्ष सुर्यकांत महाजन (अध्यक्ष - आर्य वैश्य महासभा जिल्हा बीड) व अजय रुद्रावार (सचिव) यांनी पुढाकार घेतला आहे. या शिबिराचे प्रोजेक्ट चेअरमन म्हणून रो. डॉ. निलेश जगदाळे व वैभव झारकर हे शिबिराच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत. हा समाजोपयोगी उपक्रम बीडकरांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून, अनेक गरजूंना नवजीवन देणारा ठरेल. हात गमावलेल्या सर्वांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## संस्कारक्षम पिढी घडवणे पालकांच्या हाती–प्रा.तुषार डोडिया



माजलगाव (प्रतिनिधी) : विद्यार्थ्यांचे करियर जरी शाळेत घडत असले तरी आपल्या पाल्याला शिस्त व चांगल्या सवई लावणे पालकांची जबाबदारी असते आपल्या मुलावर फोकस करून त्यांच्याबरोबर संवाद साधने त्याला वेळ देणे, शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त ठेवणे, मुलांना जंक फूड पासून दूर ठेवणे, त्यांच्यात सामाजिक जाणीव निर्माण करणे त्याची शाळेतील उपस्थिती वाढवणे आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे मुलांना मोबाईलचा मर्यादित वापर करायला शिकऊन त्यांच्यावरील अवास्तव अपेक्षांचे ओझे कमी करणे या सप्तसूत्री चा अवलंब करून संस्कारक्षम पिढी घडवण्याचे कार्य पालकांच्याच हाती आहे असे विचार शिक्षण तज्ञ प्रा. तुषार डोडिया यांनी व्यक्त केले ते माजलगाव येथील फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी मधील विद्यार्थी पालक मेळाव्यात बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग चांडक हे होते.

काल दि. ५ नोव्हेंबर गुरुनानक जयंती साजरी करून फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी चा विद्यार्थी पालक मेळावा संपन्न झाला मेळाव्यात पुढे बोलताना प्रा.दोडिया म्हणाले पालकांनी आपल्या पाल्याच्या आवडी निवडी ओळखून त्यांना शिस्तीत वाढवले पाल्य ऐकत नसतील तर वेळ प्रसंगी रागावून समजावून त्यांना योग्य मार्गदर्शन केले तर ही मुलं आचार विचाराने प्रगल्भ बनतील अभ्यासात पुढे राहतील पण त्यासाठी अगोदर पालकांना ही स्वतः मध्ये शिस्त आणावी लागेल, आजची पिढी अत्यंत टॅलेंट असून ती आपल्यातील चुका उणीवा सहज शोधत असते म्हणून आपण ही तेवढेच सतर्क राहून त्यांना घडवले पाहिजे.

यावेळी व्यासपीठावर पालक प्रतिनिधी सौ. रिटा बाहेती चंद्रकांत मोरे दीपाली साखरे व नागरगोजे सर सह प्राचार्या सारिका बजाज संचालक अण्णा साहेब तौर प्रभाकर शेटे शेख अली पटेल विराजमान होते.

## लऊळच्या सई शिंदेची सीए परीक्षेत उत्तुंग भरारी



लवूळ (प्रतिनिधी) माजलगाव तालुक्यातील लऊळ येथील सामान्य कुटुंबातील सई सुरेश शिंदे हिने सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या सीए परीक्षेत उत्तीर्ण झाली आहे. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

लऊळ सारख्या ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातील आणि शिक्षणाची फारशी पार्श्वभूमी नसलेली साई शिंदे येथील रहिवाशी असून तिचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण माजलगाव येथील सिंधफना पब्लिक स्कुल या ठिकाणी झाले असून महाविद्यालयालयण शिक्षण हे गरवारे कॉलेज पुणे येथे झाले आहे तिने द. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया च्या वतीने सप्टेंबर २०२५ मध्ये पुणे येथे घेण्यात आलेल्या सीए परीक्षेमध्ये घवघवीत हे यश संपादन केले आहे. तिच्या या यशाबद्दल ग्रामसेवक चंद्रकांत शिंदे ,विजय करवा, बालासाहेब चव्हाण गुरुजी, भास्कर शिंदे गुरुजी, रामा भले, मोहन डोईफोडे सर, रंगनाथ भाऊ राठोड, चेअरमनदेवानंद शिंदे, पद्माकर कुरे, संचालक बारीकराव शिंदे, चंद्रसेन वाशिंबे तात्या, जगदीश भंडारी, श्री किसन शिंदे, भगवान रासवे, गजानन विद्यालयाचे मुख्याध्यापक घंटाजी सर, जिल्हापरिषद शाळेचे मुख्याध्यापक बाजीराव राठोड, गोरक्षनाथ भले गुरुजी, गणेश कल्याणराव शिंदे, गण्या स्वामी, करांडे गुरुजी, वैजनाथ गडसिंग, पत्रकार राजेंद्र भंडारी,आणि सई चे वडील सुरेशनाना शिंदे यांनी भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या असून अभिनंदन केले आहे.

## बीड–नाळवंडी आणि बीड रेल्वे स्थानक रस्त्याचे काम तात्काळ सुरु करावे

### माजी आ.राजेंद्र जगताप यांची मागणी

बीड (प्रतिनिधी) बीड शहरापासुन जवळच असणारे नाळवंडी गावाला आणि नव्यानेच सुरु झालेल्या रेल्वे स्थानकाला जायचं म्हणलं तर रस्ता दुर्बीणतून शोधावा लागतो असं चित्र आहे हे चित्र बदलणे गरजेचे आहे आणि त्यावर उपाय म्हणजे हे दोन्ही रस्ते दर्जेदारपणे तयार होणे अत्यावश्यक आहे.

बीड शहराला लागणारा बहुतांशी भाजीपाला हा नाळवंडी गावातून येतो आणि येथील शेतकऱ्यांना बीड शहरापर्यंत भाजीपाला आणणे रस्त्या अभावी फार कठीण बनले आहे. ही समस्या सोडवणे काळाची गरज बनली आहे. अनेक दशकापासून बीड ते नाळवंडी रस्त्याची अत्यंत दुरावस्था आहे. हे चित्र बदलण्यासाठी प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करून सदर रस्त्याला मुबलक निधी उपलब्ध करून द्यावा, याच रस्त्यावर दहीफळ, चिंचोली ही गावे सुद्धा मुख्य प्रवाहत येतील याची काळजी प्रशासनाने घ्यावी. हा रस्ता सिमेंट रस्ता होणे गरजेचे आहे कारण डांबरी रस्ता टिकत नाही याची आठवण माजी आमदार राजेंद्रजी जगताप यांनी करून दिली आहे.

या रस्त्या खेरीज बीडकरांचे रेल्वेचे स्वप्न नुकतेच सत्यात उतरले मात्र पालवन चौकाकडे असणाऱ्या रेल्वे स्थानकाला जायचे म्हटले तर अत्यंत खड्डेमय रस्त्यातून प्रवास करावा लागतो हे भयान वास्तव बदलून पोलीस मुख्यालय पालवन चौक मार्गे रेल्वे स्थानकापर्यंत चा रस्ता नव्याने बनवून खड्डे मुक्त करावा व बीडकरांची या त्रासातून मुक्तता करावी असे प्रतिपादन माजी आमदार राजेंद्र जगताप यांनी केले आहे.

## विकास जोंधळे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर



नांदेड दि ६ (प्रतिनिधी)- चॅनलच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्ताने दिला जाणारा महाराष्ट्र भूषण राज्य स्तरीय आदर्श कलारत्न पुरस्कार नावघाट सराफा होळी नांदेड येथील विकास जोंधळे यांना जाहीर करण्यात आला आहे.

डी एस पी न्यूज लाईव्ह चॅनलच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त दि ९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वा. दरम्यान मोजे वडूज ता. खटाव जि. सातारा येथे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळा आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे.विकास जोंधळे (प्रदेश उपाध्यक्ष कलावंत संघटना) असून ते अनेक सामाजिक उपक्रम राबवित असतात, तर हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शहरातील

सिद्धोंधन कदम, शेख नईम, स्वप्नील धुळे, श्रीरंग चींतेवार, महेंद्र कदम,आकाश गायकवाड, पौर्णिमा कांबळे, प्रियंका बोधनकर, वंदना हाटकर यांनी विकास जोंधळे यांना शुभेच्छा दिल्या व त्यांचे कौतुक केले.

## श्री क्षेत्र गौतमऋषी देवस्थानास धाकट्या ब्रह्मगिरीचे महात्म्य

### काकडा सांगता निमित्त महापंगत संपन्न

बीड (प्रतिनिधी) : बीड शहरापासून पालवन श्री क्षेत्र गौतमऋषी संस्थान घोलपदरा पालवन येथे ह.भ.प.श्री.गु.महंत श्रीरंग महाराज डोंगरे यांच्या मार्गदर्शना आयोजित काकडा सांगता निमित्ताने ह.भ.प.श्री. रामायणाचार्य विश्वंभर महाराज माळोदे यांच्या सुश्राव्य कीर्तन संपन्न झाले असुन या निमित्ताने राजेंद्र मस्के परिवारातर्फे महापंगतीचे आयोजन करण्यात आले होते. पंचक्रोशीतील अनेक भाविक भक्तांनी कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. श्री. क्षेत्र गौतमऋषी देवस्थान जिल्ह्यात भाविक भक्तांच्या श्रद्धेमुळे विख्यात झाले असून दर अमावस्येला भाविक भक्तांची दर्शनासाठी गर्दी असते. या देवस्थानवर येणाऱ्या भाविक भक्तांच्या सोयीसाठी रस्ता, नाल्या, लाईट, पाणी अशा मुलभूत पालवण ग्रामस्थ व राष्ट्रवादी शरदपवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या पुढाकाराने सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. संक्रांति दरम्यान त्र्यंबकेश्वर ब्रह्मगिरी प्रदक्षिणेसाठी अलोट गर्दी असते. त्याच धर्तीवर बीड व पंचक्रोशीतल भाविकांची प्रदक्षिणेसाठी गर्दी होते. गेली अनेक वर्षापासून प्रदक्षिणेची परंपरा भक्तांनी संवर्धित केली आहे. महर्षी गौतम ऋषीच्या पदस्पर्शानि पावन झालेल्या प्राचीन तपोभूमीत संत महंत ऋषी मुनींच्या कृपा आशीर्वादाने भाविक भक्तांच्या विशेष परिश्रमातून श्री त्र्यंबकेश्वर महादेव व श्री रुक्मिणी पांडुरंगाचे भव्य नतून मंदिराचे व शिखराचे बांधकाम करण्यात आले आहे.तसेच या संस्थानात श्री रुक्मिणी पांडुरंग, जगद्गुरु तुकाराम महाराज महंत गुरु महादेव बाबा यांच्या नतुन मूर्तीची स्थापना यापूर्वीच करण्यात आलेल्या आहेत.

## उद्यापासून आळंदी येथे कासार धर्मशाळेत पारायण सोहळा



शिरूर कासार दि ६(प्रतिनिधी)- ज्ञानेश्वरी पारायण फंड ही एक कासार समाजाची पारमार्थिक परंपरा सांभाळणारी संस्था असुन गेली बत्तीस वर्षापासुन माऊलीचा संजिवन समाधी सोहळा व संत महादबा कासार यांच्या पुण्य पर्वकाळी सामुहिक ज्ञानेश्वरी पारायण सोहळा परंपरा आजतागायत सुरू ठेवली याही वर्षी दि.८ नोहे. पासुन कासार धर्मशाळेत पारायण सोहळा होत असुन विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

स्व .शाहुराव ईटकर लातूर व स्व . वेळापुरू गुरूजी माजलगांव यांनी बत्तीस वर्षापुर्वी पारमार्थिक मेढ रोवली त्याच परंपरेचे पाईक म्हणून प्रमुख मुख्य मार्गदर्शक श्रीकांत ईटकर व अध्यक्ष अरूण वेळापुरे हे अध्यक्षपदाची धूरा गुरू वै .किसन महाराज साखरे यांचे अशिर्वादाने सांभाळत आहेत. येणा-या माऊली भक्तांची निवास व्यवस्था कासार धर्मशाळेत व तिथेच हा सोहळा संपन्न होणार आहे,श्रीमती कमलताई दहातोंडे (ज्ञानेश्वरी अभ्यासक ) ,उज्वलाताई अंदूरे आणि भागवताचार्य विनायक महाराज अष्टेकर हे व्यासपिठावर पारायणाचे नेतृत्व करणार आहेत ,त्याशिवाय नित्य काकडा भजन ,प्रवचन ,हरिपाठ ,किर्तन व हरिजागर असा अखंड हरिनामाचा जागर होणार आहे .तर साध्वी अनुराधा दिदी यांचे सलग दोन दिवस तर ॲड नरसिह मैंदर्गे ,प्रज्ञाताई पंडीत ,अनंत शास्त्री मुळे व विजयकुमार गाडेकर पाटील यांची प्रवचन सेवा होणार आहे .यातअभय महाराज कुंभकर्ण (केज), कमलताई दहातोंडे (परळी ) ,उध्दव महाराज कोळपकर (पुणे),भागवत महाराज पाटील (संभाजीनगर ) ,अनिरूध्द महाराज ,जयंत महाराज (नासिक ) यांचे कीर्तन व यशोधन महाराज साखरे यांचे काल्याचे कीर्तनाने सोहळ्याचा समारोप होणार आहे. संत महादबा कासार पुण्यतिथीचे कीर्तन विनायक महाराज अष्टेकर यांचे १० नोहे.रोजी दहा ते बारा या वेळेत होणार आहे

## बालाघाट हिल हाफ मॅरेथॉनमध्ये राज्यभरातून दीड हजार धावपटू धावणार

बीड दि ६ (प्रतिनिधी) डोंगराळ भाग आणि दाट झाडीने वेढलेल्या बालाघाटमध्ये शहरातील योगा ग्रुप व शिराळे कंट्रक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि बाळराजे कंट्रक्शन च्या माध्यमातून रविवार दि ९ नोव्हेंबर रोजी बालाघाट हिल हाफ मॅरेथॉन या भव्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ५, १० आणि २१ किलोमीटर अंतराच्या तीन विभागांमध्ये होणार आहेत. राज्यभरातून आलेले दीड हजार धावपटू या पर्वातून आरोग्य, उत्साह आणि निसर्गाचा संगम अनुभवणार आहेत.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, महावितरण कोकण भवनचे संचालक दिलीप जगदाळे, चंपावती क्लबचे अध्यक्ष अमरसिंह पंडित, मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहेमान, स्पोर्ट्स अथॉरिटी' ऑफ इंडिया, छत्रपती संभाजीनगरच्या उपसंचालक डॉ. मोनिका घुगे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत व जिल्हा क्रीडा अधिकारी तसेच योगा प्रतिष्ठाणचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. मॅरेथॉन मार्गावर दुतर्फा ढोल पथक उभा राहून स्पर्धकांचा उत्साह वाढविणार आहेत. दरम्यान बालाघाट हिल हाफ मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांना शनिवार दि. ८ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून सायंकाळी ५ वाजपेर्यंत राजयोग मंगल कार्यालय, धानोरा रोड येथे टी शर्ट, गुडी बॅग, टाईम चीप, सेन्सर चीप आदी साहित्य वाटप केले जाणार आहे. धावपटूंच्या आरोग्य सुरक्षेसाठी रुग्णवाहिका व वैद्यकीय पथक मार्गावर तैनात राहणार असून, यामध्ये कार्डियाक अँब्युलन्सचा समावेश आहे. वॉर्मअप आणि झुंबा डान्सने सुरुवात स्पर्धेपूर्वी सकाळी ५.३० वाजता वाजता झुंबा डान्स व वॉर्मअप सत्र होणार आहे. त्यानंतर २१ कि.मी. धावपटूंना सकाळी ६.०० वा., १० कि.मी. साठी ६.१५ वा. तर ५ कि.मी. साठी ६.२० वा. मॅरेथॉनचा झेंडा दाखविला जाईल. धावपटूंना प्रत्येक कि.मी. वर पाणी, केळी, बिस्कीट, लेमन गोळी, एनर्जल, मेडीकल कीट आणि स्प्रे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. महिला व पुरुष गटात प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकासाठी अडीच लाख ते साडतीन लाख रुपयांपर्यंतची बक्षीसे देऊन गौरविण्यात येणार आहे.

## रात्र नव्हे काळ वैऱ्याचा सुरू झालाय, तेव्हा थोडं जपून !

### एस.एम.युसूफ यांचे मतदारांना आवाहन

बीड (प्रतिनिधी) - नगरपालिकेची निवडणूक जाहीर झाली आहे. २ डिसेंबरला मतदान तर ३ डिसेंबरला निकाल घोषित होणार आहे. वेळ अत्यंत कमी असल्याने प्रचाराला जोर येणार आहे. यामुळे रात्र नव्हे तर काळ वैऱ्याचा सुरू झालेला आहे. तेव्हा मतदारांनी निवडणूक काळापासून ते निकाल लागेपर्यंत थोडं जपून रहावे असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, कधी नव्हे ते यंदा फार मोठ्या लांबलचक खंडानंतर नगरपालिकेची निवडणूक लागली आहे. यापूर्वीच्या पंचवार्षिक निवडणुकीत निवडून आलेल्या नगराध्यक्षांसह नगरसेवकांचा कार्यकाळ संपून चौथं वर्ष सुरू आहे. तेव्हा आता कुठे ही निवडणूक लागली आहे. या मोठ्या खंडामुळे नगरसेवक, नगराध्यक्ष होण्यासाठी अनेक हौसे, नवसे, गवसे गुडघ्याला बाशिंग बांधून तयार झालेले आहेत. अनेक पक्ष आणि अनेक उमेदवार यावेळी निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. प्रत्येक पक्ष आणि उमेदवार निवडून येण्यासाठी जीवाचा आटापिटा करणार आहेत. या काळात मतदार मनात असलेल्या व आवडणाऱ्या उमेदवारांना पुढे येऊन सहकार्य करतात. वास्तविक पाहता आपल्या भारत देशात गुप्त मतदान पद्धत असतानाही अनेक मतदार हे उघडपणे कुणाची बाजू घेऊन तर कुणाला विरोध करून निवडणुकीत रमताना दिसतात. निकाल लागल्यानंतर निवडून येणाऱ्याचे समर्थक आनंद व्यक्त करतात तर पडलेल्यांचे समर्थक हिरमुसले होऊन जातात. यानंतर मात्र निवडून आलेले आणि पडलेले असे सर्वचजण एक दुसऱ्यांच्या गळ्यात गळे घालून राजकारणाचा आनंद घेतात मात्र या दोघांनाही निवडणूक काळात समर्थन देणाऱ्यांमध्ये आपसात वैर निर्माण होते. असे चित्र प्रत्येक निवडणूकीनंतर दिसते वास्तविक पाहता निवडून येणारा वैयक्तिक तर सोडा सामाजिक कार्य सुद्धा व्यवस्थितरित्या करत नाही. तर पडलेला आपण पडलेलो आहे असे म्हणत समस्यांवरून, प्रश्नांवरून काढता पाय घेतो. अशा अवस्थेत सर्वसामान्य मतदारांचीच गोची होते आणि त्यांचे निवडून आलेल्या सह पडलेल्या सोबत आणि दोघांच्या कार्यकर्त्यांसोबतही पुढील निवडणुकीपर्यंत किंवा कायमस्वरूपी वैर निर्माण होते. ही बाब शहरातील अनेक प्रभागांमध्ये प्रत्येक निवडणुकीनंतर दिसून येते. तेव्हा मतदारांनो आता रात्र नव्हे काळ वैऱ्याचा सुरू झालाय तेव्हा थोडं जपून रहा कोणत्याही उमेदवारासाठी झटताना वैर निर्माण होणार नाही याची दक्षता घ्या असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.

## बीडमध्ये रोटरी क्लबच्या स्त्री जन्माचे स्वागत उपक्रमांत मातांचा उत्स्फूर्त सन्मान

बीड (प्रतिनिधी) रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने शहरात 'स्त्री जन्माचे स्वागत' उपक्रमाद्वारे मातांचा सन्मान करण्यात आला. नवरात्रीच्या पहिल्या माळेपासून भाऊबीजपर्यंत चाललेल्या या उपक्रमांतर्गत सिव्हिल हॉस्पिटलमध्ये जन्मलेल्या प्रत्येक मुलीच्या आईला साडी-चोळी देऊन गौरवण्यात आले. उपक्रमाद्वारे एकूण ४०२ मातांचा सन्मान करण्यात आला.

रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात.दरम्यान नवरात्रीच्या पहिल्या माळेपासून भाऊबीज या काळात जन्मलेल्या स्त्री जन्माचे स्वागत रोटरी कडून करण्यात आले. या उपक्रमांतर्गत बीडच्या शासकीय रुग्णालयात रोटरीने ४०२ मतांचा सन्मान केला. या कार्यक्रमातून उपस्थितांना आनंद आणि भावनिक समाधानाची अनुभूती झाली, तर मातांच्या चेहऱ्यावर गर्व आणि उत्साह स्पष्ट दिसून आला. या उपक्रमाचा उद्देश फक्त मातांना सन्मानित करणे नाही, तर समाजात स्त्री जन्माचे महत्त्व अधोरेखित करणे आणि महिलांच्या हक्कांसाठी जनजागृती निर्माण करणे हा होता.

रोटरी क्लबचे अध्यक्ष विकास उमापूरकर, सचिव सुमित जैस्वाल, प्रोजेक्ट चेअरमन राजेंद्र मुनोत, तसेच सदस्य संकेत कदम आणि प्रमोद करमाळकर तसेच शासकीय रुग्णालयातील कर्मचारी यांच्या उपस्थितीत हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. त्यांनी या सामाजिक उपक्रमाला चालना देऊन मातांसाठी प्रेरणादायी वातावरण निर्माण केले.

रोटरी क्लबच्या या उपक्रमामुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचला असून स्त्री जन्माबद्दलचा दृष्टिकोन सुधारण्यास मदत झाली. उपस्थित नागरिकांनी उपक्रमाची प्रशंसा केली आणि भविष्यातही अशा सामाजिक कार्यांना पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले.

## प्रत्येक व्यसनावर मात करता येते–डॉ.जगदीश टेकाळे



बीड (प्रतिनिधी) : व्यसन म्हणजे अशी सवय जी सुरुवातीला आनंद, तणावमुक्ती किंवा समाधान देणारी वाटते पण काळानुसार ती शरीर, मन आणि वर्तनावर नियंत्रण मिळवते माणूस त्या सवयीशिवाय राहू शकत नाही आणि आयुष्याचे ध्येय, जबाबदाऱ्या, नाती सर्व विसरून जातो व्यसन दोन प्रकारचे असू शकते – शारीरिक आणि मानसिक शारीरिक व्यसन म्हणजे शरीराला एखाद्या पदार्थाची सवय लागणे, जसे की दारू, सिगारेट, ड्रग्स मानसिक व्यसन म्हणजे एखादी गोष्ट मनातून सोडता न येणे, जसे की मोबाईल, गेमिंग, सोशल मीडिया व्यसनाचे प्रमुख प्रकार: दारूचे व्यसन – शरीरातील यकृत, हृदय आणि मेंदूवर घातक परिणाम. सिगारेट / बीडी – फुफ्फुसांचे कर्करोग, श्वासाच्या अडचणी, तंबाखू, गुटखा, पान मसाला – तोंडाचा कर्करोग, दातांचे नुकसान, ड्रग्स / नशेचे पदार्थ – मानसिक संतुलन बिघडवतात, हिंसक वर्तन, मोबाईल / इंटरनेट / गेमिंग – मेंदू सतत उत्तेजना, झोप आणि लक्ष कमी, जुगार / सट्टा – आर्थिक नुकसान, घरात भांडण, समाजात अपमान, अन्न, साखर किंवा कॅफिनचे व्यसन – हार्मोन्स बिघडवते, वजन वाढते, प्रेम किंवा संबंधाचे व्यसन – अति आसक्तीमुळे मानसिक तणाव, कामाचे व्यसन – Workaholic व्यक्तीला विश्रांती मिळत नाही, तणाव वाढतो, सोशल मीडियाचे व्यसन – सतत लाइक्स, व्ह्यूज यांचा विचार मनावर ताबा, व्यसनामुळे शरीरात विषारी द्रव्ये जमा होतात, रक्तप्रवाह कमी होतो, रोगप्रतिकारशक्ती कमी होते, मानसिकदृष्ट्या व्यक्ती चिडचिडी, अस्थिर आणि एकाकी होते, कुटुंबात भांडणं वाढतात, विश्वास कमी होतो, समाजात मानहानी होते.

व्यसन हळूहळू आत्मविश्वास, आरोग्य आणि स्वप्नं हिरावून घेतं पण चांगली गोष्ट म्हणजे – प्रत्येक व्यसनावर मात करता येते, योग्य सल्ला, समुपदेशन आणि उपचारांनी माणूस पुन्हा नवजीवन जगू शकतो, स्वतःवर विश्वास ठेवा,पहिले पाऊल उचला आणि "मी व्यसनमुक्त होणारच" हा संकल्प करा, निरोगी शरीर, शांत मन आणि आनंदी जीवन – हीच खरी संपत्ती व्यसनातून मुक्त होण्यासाठी संपर्क: डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

**टि.सी.हरवला आहे**

आदित्य छगन राठोड या नावाचा टि.सी. कोळगाव ते नाळवंडी नाका या परिसरात हरवला आहे. हरवला आहे. सापडल्यास संपर्क साधावा.

**– संपर्क –**

मो.९४०५५५५३१८

15967/14179

**टि.सी.हरवला आहे**

चेतन चंद्रकांत राठोड रा.लक्ष्मीआई तांडा ता.जि.बीड. लक्ष्मीआई तांडा ते बीड बसस्टॅण्ड रोडवर हरवला आहे. सापडल्यास संपर्क साधावा.

**– संपर्क –**

मो.९८८१७३९८२६

15968/14181

दै.पार्श्वभूमी,बीड Date - 07/11/2025

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME OF

**OLD NAME - SHAIKH KAREEM SHAIKH GAFAR**

**New Name : KARIM GAFFAR SHAIKH**

Address-Gandhanpura Majalgaon Po. Majalgaon Beed Maharashtra - 431131

# पार्श्वभूमी

दि.०७ नोव्हेंबर २०२५ शुक्रवार




## रामलिंग मुंडे यांना धुनकवड गणातून सर्वाधिक पसंती

बीड दि.६(प्रतिनिधी):- स्थानिक स्वराज्य संस्था जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांचे वारे सध्या जोरात आहे त्यामुळे इच्छुक सुद्धा जास्त प्रमाणात आहेत पण धुनकवड पंचायत समिती गणातून उच्चशिक्षित व कर्तव्यदक्ष तरुण उमेदवार रामलिंग मुंडे यांच्या नावाचीच सर्वत्र सर्वसामान्य नागरिकांत चर्चा चालू आहे त्यांनी आतापर्यंत सर्वसामान्य जनतेसाठी खूप मोलाचे कार्य केले आहे लोकांच्या पान २ वर

## वंदे मातरम राष्ट्राच्या प्रेम भावनेचे गीत–प्राचार्य डॉ.पंडित खाकरे

चौसाळा दि.६(प्रतिनिधी):- भारतीय स्वातंत्र्याचा लढा महात्मा गांधी यांच्या नेतृत्वात लढला गेला त्यावेळेस वंदे मातरम या गीताने संपूर्ण भारतीय लोकांना भारावून टाकले होते. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.पंडित खाकरे यांनी केले. कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे उद्योजकता, नाविन्यता मंत्रालय व विद्यार्थी विकास मंडळाने बंकिमचंद्र चटोपाध्याय लिखित वंदे मातरम या गीतास दीडशे वर्ष पूर्ण झाल्याबद्दल आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

### साखर कारखान्यांनी एफआरपी प्रमाणे ऊस दर जाहीर करण्याची मागणी

## माजलगांवमध्ये आज युवा शेतकरी संघर्ष समितीचा रस्ता रोको

**माजलगांव दि.६(प्रतिनिधी):– चालू गळीत हंगामात माजलगाव मतदारसंघातील साखर कारखान्यांनी एफआरपीप्रमाणे ऊस दर जाहीर करावा यासह इतर मागण्यांसाठी युवा शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने आज दि.७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता माजलगांव येथील छत्रपती संभाजी महाराज चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.**

या संदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, चालू गळीत हंगाम (२०२५ - २०२६) साठी माजलगाव मतदार संघातील कोणत्याही कारखान्याने केंद्रशासनाच्या आदेशित एफआरपीप्रमाणे ऊजदर किती देणार ? याबाबत कोणतेही भाष्य किंवा प्रसिद्धी पत्रक जाहीर केलेले नाही. आधीच अतिवृष्टीने यावर्षीचे खरिपाची होती नव्हती ती पिकाची माती केली आणि तोंडाला पाणी पुसावी एवढीच मदत शासनाने दिली; ऊस पिकातून काहीतरी हाताला लागेल या आशेवर शेतकरि असताना, चालू गळीत चालू गळीत हंगामात विना ऊस दर जाहीर करता मतदार संघातील सर्व साखर कारखाने चालू झाले असून विनादर निश्चिती ऊस गाळप केला जात आहे. प्रशासनाने कार्यक्षेत्रातील सर्व साखर कारखान्यांना ऊस दर जाहीर करायला भाग पाडावे. तात्काळ ऊस दर मतदार संघातील सर्व कारखान्यांनी जाहीर केला नाही तर येणाऱ्या ७ नोव्हेंबर २०२५ रोजी आपल्या माजलगाव शहरातील संभाजी महाराज चौकात सकाळी ठीक ११:०० वाजता युवा शेतकरी संघर्ष समिती माजलगाव च्या वतीने रास्ता रोको करण्यात येणार आहे. या रस्ता रोकोमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## प्रभाग क्र.१४ मधुन डॉ.अमरेंद्र विद्यागर आणि प्रभाग क्र.१२ अ मधुन अमर माने काँग्रेसकडून इच्छुक

बीड दि.६(प्रतिनिधी):- शहरातील प्रभाग क्र.१४ अ व प्रभाग क्र.१२ अ एस.सी.राखीव सुटलेला आहे. यामधुन प्रबळ दावेदार म्हणून अनुक्रमे डॉ.अमरेंद्र विद्यागर व अमर अ.माने काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहे. गेल्या अनेक वर्षापासुन डॉ.अमरेंद्र द.विदयागर आणि अमर अ.माने यांचे भीम शक्ती संघटनेमार्फत प्रभागात सामाजिक,शैक्षणिक व आरोग्यविषयक कामे आहेत. सर्वसामान्यांच्या सुख-दु:खात हे सतत सहभागी राहीलेले आहे. त्यांच्या कार्याबद्दल नागरीकांमध्ये चांगली भावना आहे. नागरीकांच्या आग्रहावरूनच दोघांनी आगामी नगर पालीका निवडणूकीत काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढविणार असल्याचे समजते. स्थानिक स्तरावर रस्ते, पाणी पुरवठा, स्वच्छता आणि युवकांसाठी रोजगाराच्या संधी या प्रश्नावर



काम करण्याची दोघांची भुमिका असणार आहे. या निवडणूकीत त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्धार नागरीकांनी केला आहे.

## लिंबागणेश जि.प.गटातुन सुभाष मस्के प्रबळ दावेदार

बीड दि.६(प्रतिनिधी):-जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचे राजकीय तापमान चढू लागले असून लिबागणेश जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुभाष मस्के यांच्या नावाची चर्चा शिगेला पोहचली आहे. यांचे नाव अधिकृत उमेदवार म्हणून जवळपास अंतिम मानले जात असून स्थानिक पातळीवर मस्के दाम्पत्यावर एकमुखी विश्वास व्यक्त होत आहे. तसेच लोकसभा, विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार गटाची ताकद वाढविण्यासाठी सुभाष मस्के यांनी दिवसरात्र एक केली होती. त्यामुळे आता मस्के यांना न्याय देण्यासाठी खासदार बजरंग सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर देखील बळ देतील असे बोलले जात आहे.



सुभाष मस्के यांनी केवळ आजचा राजकिय फायदा म्हणून नव्हे तर सामाजिक राजकीय चुलते मिलन मस्के नेतृत्वाखाली अनेक पान २ वर

## संस्कार भारती बीडचा दिपोत्सव दिप ‘वंदे मातरम्’ने साजरा

बीड दि.६(प्रतिनिधी):-संस्कार भारती बीड च्या वतीने प्रतिवर्षी प्रमाणे कार्तिकी पौर्णिमेला घेण्यात येणारा दीपोत्सव दि.५ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी खंडेश्वरी परिसरातील दिपमाळांवर दिप वंदेमातरम ने साजरा करण्यात आला.

वंदे मातरम या गीताला १५० वर्षे पूर्ण झाली आहेत.यानिमित्त यावर्षी उजळणाऱ्या दिव्यांच्या प्रकाशात वंदे मातरम हि अक्षरे भूअलंकरणाने सजली होती. कार्यक्रमची सुरवात सामुहीक संस्कार भारती गीताने करण्यात आली.त्या नंतर ज्योत से ज्योत लगाते चलो या गाण्यावर संस्कार भारतीच्या सर्व



कलासाधकांनी २०२५ पणत्या प्रज्वलित केल्या .प्रारंभी प्रमोद वझे, लक्ष्मीकांत खडकीकर, महेश देशमुख यांनी रांगोळीतुन वंदेमातरचे रेखाटन केले.वंदेमातरम या गीतावर अनुराधा चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली साई नृत्यालयाच्या गार्गी जोशी,वेदिका वडवणीकर,प्रांजल सुर्यवंशी व नंदीनी गुरखुदे यांनी भरतनाट्यम सादर केले.विवेक काटे व श्रीमती आशा भारती यांनी देशभक्ती व दिवाळीची गाणी सादर पान २ वर

## भाडे थकल्याने ग्रा.पं.ने गाळ्यांना ठोकले कुलूप

केज दि.६(प्रतिनिधी)-तालुक्यातील विडा ग्रामपंचायतीकडून गाळे भाड्याने घेऊन व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांनी मागील दोन वर्षांपासून भाडे थकविले. त्यांना तीन वेळा नोटीस देऊन ही भाडे भरीत नसलेल्या गाळ्यांना कुलूप ठोकण्यात आले आहे. त्यामुळे व्यवसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. विडा येथे ग्रामपंचायतीने दीडशेहून अधिक गाळे उभारलेले आहेत. हे गाळे भाड्याने घेऊन व्यावसायिक आपला व्यवसाय करतात. मात्र वेळेवर भाडे जमा न करणाऱ्या व्यावसायिकांना ग्रामपंचायतीने भाडे भरण्यासंदर्भात तीन वेळा नोटीसा दिल्या. मात्र मागील दोन वर्षांपासून भाडे थकविणाऱ्या सत्तर ते ऐंशी व्यावसायिकांच्या गाळ्यांना स्वतः सरपंच सुरज पटाईत व कर्मचाऱ्यांनी बुधवारी सकाळी कुलूप ठोकले आहे. येत्या दोन दिवसांत भाड्याचे पूर्ण पैसे न भरल्यास गाळ्यातील सामान बाहेर काढून गाळे ताब्यात घेतले जाणार आहेत. ग्रामपंचायतीच्या गाळ्याचे भाडे वसूल वसुली नसल्यामुळे कर्मचाऱ्यांचे पगार करण्यासाठी पुरेसा पैसे नाहीत. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे पगार थकले आहेत. म्हणून ही कारवाई करण्यात आली आहे. यापुढे व्यापाऱ्यांनी गाळ्यांचे भाडे न भरल्यास अशीच कारवाई करण्यात येईल.

## मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचणाऱ्या टोळीच्या म्होरक्याचा शोध लावा–सकल मराठासेवक

कोळगाव दि ६(प्रतिनिधी) – मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मागील दोन वर्षांपासून राज्यातील मराठा समाजाला सरसकट मराठा ओबीसीतून आरक्षणाची मागणी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू कुणबी नोंदी आणि हैदराबाद गॅझेट सातारा गॅझेट अंमलबजावणी नंतर मोठं यश आले असताना दुसरीकडे विरोधकांनी खालच्या पातळीवर जाऊन संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचल्याची घटना उघडकीस आल्यानंतर सर्वत्र या घटनेचा मादळमोही कोळगाव, बंगाली पिंपळा तांदळा, परिसरातून सकल मराठासेवाकांडून तीव्र निषेध करण्यात येत आहे. तरी या षडयंत्र करणाऱ्या टोळीचा म्होरक्या लवकरात लवकर सरकारने आणि पोलिस यंत्रणेकडून शोधा अशी मागणी मराठा सेवक सामाजिक कार्यकर्ते माऊली नवले, संचालक अशोक खरात,ॲड.कृष्णा लोंढे सर यांनी केली आहे.

मराठा समाज आरक्षणापासून अनेक वर्षांपासून वंचित आहे. दरम्यान कुणबी मराठा आरक्षणाचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला मराठा आरक्षणाचा मुद्दा मनोज जरांगे पाटील यांनी सरकार ला सळो की पळो करून सोडले. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली लोकशाही मार्गाने आंदोलनाने मराठा आरक्षण संदर्भात संपूर्ण महाराष्ट्र पेटला व त्याची धग प्रत्येक गावामध्ये व प्रत्येक कुटूंब व प्रत्येक व्यक्ती पर्यंत पोहचली .जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली लाखो कुणबी पान २ वर

## बीड बसस्थानकासमोर ट्रॅव्हल्सची गर्दी

### वाहतूक कोंडी वाढली ; अपघाताचा धोका कायम

बीड दि.६(प्रतिनिधी):- बीड बसस्थानकासमोर रात्री आठ वाजण्याच्या सुमारास दररोज शेकडो खाजगी ट्रॅव्हल्स वाहनांची गर्दी होत असून, त्यातून वाहतूक कोंडी तर होतेच, एखादा मोठा अपघात होण्याची देखील शक्यता आहे.बसस्थानका पासून दोनशे मीटरच्या अंतरात खाजगी वाहनांना थांबण्यास स्पष्ट बंदी असताना बीड मध्ये मात्र नियमांचे तीन तेरा वाजत असल्याचे चित्र दिसत आहे.सायंकाळच्या सात वाजण्याच्या सुमारास कोचिंग क्लासेस, शासकीय कार्यालय, तसेच इतर कामावरून घरी जाण्यासाठी निघालेल्या नागरिकांना या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असून अपघाताचा धोका होत आहे.बीड शहरातून खाजगी ट्रॅव्हल्स मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली आदी शहरात जाण्यासाठी शेकडोंच्या संख्येने जातात.

मागील वर्षीच खाजगी ट्रॅव्हल्सने धडक दिल्याने एकाच जीव घेतला होता.मागील वर्षी याच ठिकाणी ट्रॅव्हल्सची धडक बसून एका इसमाचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्या पार्श्वभूमीवरच बसस्थानका समोरील ट्रॅव्हल्स थांबे बंद करण्यात आले होते.पोलिसांनी ती वाहने रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ थांबण्याच्या व तिथेच प्रवासी भरण्याच्या सूचना देण्यात आल्या.मात्र, पुन्हा बसस्थानका समोरच थांबे सुरू केल्याने प्रश्न निर्माण झाला आहे की नेमका परवाना कोण देतंय? आणि कोणाच्या आशिर्वादावर हा धंदा चालतोय ?वाहतूक शाखा आणि शहर पोलीस ऑटो रिक्षा, दुचाकी धारकांना




दंड ठोठावण्यात ‘तपासणीची तत्परता’ दाखवतात; मात्र या ट्रॅव्हल्स समोर मूक प्रेक्षक होतात, अशी नागरिकांची तक्रार आहे.आरटीओ विभाग कडूनही या वाहनांची तपासणी होत नसल्याने, काही आर्थिक व्यवहार चालतो का ? असा संशय बळावत आहे.

नागरिकांची मागणी : बसस्थानकासमोर ट्रॅव्हल्स थांबविण्यावर ताबडतोब बंदी करावी., शहराबाहेरील ठिकाणी वाहन भरण्याची परवानगी द्यावी.वाहतूक सुरळीत करण्यासाठी पान २ वर

### माजलगावात नगराध्यक्ष उमेदवारीसाठी शेख मंजूर चर्चेतले नाव

## शहराचा विकास करणाऱ्या नेतृत्वाला पक्षाकडून संधी मिळण्याची अपेक्षा



माजलगाव (प्रतिनिधी) :- माजलगाव नगर परिषद निवडणुकीची रणधुमाळी येत्या काळात सुरू होणार आहे.दरम्यान नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार म्हणून माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांच्या प्रतिनिधी त्यांच्या आई शेख यास्मिनबी चांदसाहब यांचे नाव नागरिकांमधून चर्चील्या जात आहे. नगराध्यक्ष पदाच्या अल्प काळात शहराचा कायापालट करणाऱ्या या चरित्रवान नेतृत्वाच प्रतिनिधित्व करणाऱ्या उमेदवाराला राजकीय पक्ष किंवा स्थापन होणाऱ्या आघाड्याकडून संधीची प्रतीक्षा आहे.संधी देण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

नगरपरिषद निवडणुका जाहीर होण्याची घोषणा केव्हाही होऊ शकते.त्या अनुषंगाने माजलगावात नगरपरिषदेवर सत्ता काबीज करण्याचे राजकीय खलबतं आखल्या जात जाऊ लागले आहेत.आ.प्रकाश सोळंके यांच्या राष्ट्रवादी विरुद्ध भाजपा किंवा मोहन जगताप यांची राष्ट्रवादी किंवा सर्व पक्षीय आघाडी होऊन परस्पर विरोधी उमेदवार दिले जान्याची दाट शक्यता आहे. दरम्यान महिला ओबीसीसाठी आरक्षित असलेल्या नगराध्यक्ष पदासाठी अनेक इच्छुक उमेदवार मैदानात आहेत.दुसरीकडे शहरातील नागरिक मात्र माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांना पुन्हा नगराध्यक्ष करण्याची चर्चा करत आहे.परंतु महिला ओबीसी आरक्षण असल्याने शेख मंजूर व त्यांच्या समर्थकां कडून त्यांच्या आईचे नाव नगराध्यक्ष उमेदवारीसाठी पुढे करण्यात आले आहे.कोणत्याही पक्षाकडून उमेदवारी आली तरी त्यांनाच मतदान करणार असल्याची नागरिकांची मानसिकता आहे. शे.मंजूर यांनी नगराध्यक्ष पद लाभलेल्या कमी काळात शहराच्या विकासात मोठ्या प्रमाणात हातभार लावला आहे. १४ वर्षापासून पान २ वर


## जाहीर प्रगटन

आम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, मी जाहीर प्रगटन देणार नामे शेख शहेबाज करीम, रा. हिंगणी (ह.), ता.जि.बीड, यांनी सरवत नसीर खान पठाण, रा.जालना रोड, बीड, यांचे मालकी व ताब्यातील सर्व्हे नं. १९४/अ/१-४ तरफ खोड मधील भूखंड क्र.१ ज्यास नगर परिषद मिळकत क्र.२-१०-२६७६ असा असून, ज्याचा नगर भूमापन क्र.२४९८ पैकी असा मिळालेला असून, ज्याची लांबी दक्षिण-उत्तर ५५ फूट व रुंदी पुर्व-पश्चिम ३० फूट आहे, ज्याचे एकूण क्षेत्रफळ १६५० चौ. फूट म्हणजेच १५३.३४ चौ. मीटर आहे.

ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस : महंमद अलीमोद्दीन बशीरोद्दीन यांचा प्लॉट क्र.१, पश्चिमेस : श्री. बलभिम शिंदे यांचा प्लॉट, दक्षिणेस : २० फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस : सेंट ॲन्स स्कुल चर्चचे कम्पाऊंड वॉल/भिंत.

उपरोक्त चतुः सिमेअंतर्गत येणाऱ्या प्लॉट मिळकतीचे कायम खरेदी बाबत जाहिर प्रगटन देणार यांनी सदर मिळकतीच्या उपरोक्त नमूद मुळ मालकाशी व्यवहार करण्याचा करार केलेला आहे.

तरी सदर उपरोक्त प्लॉट मिळकतीचे मालक यांनी वरील चतुः सिमेअंतर्गत येणारी मिळकत ही निर्विवाद असून, यापूर्वी बँक कर्ज, खाजगी कर्ज, ईसारपावती, कोणास दान, गहाण, तारण, बक्षीस, विक्री, भाडेपत्र, ईसारपावती, मुखत्यारपत्र या मार्गाने व इतर अन्य कुठल्याही मार्गाने लेखी किंवा तोंडी खरेदी बाबत, वारसाने येणारे हक्क, कूळ, इनाम, अथवा इतर प्रकारे हस्तांतरण व्यवहार झालेला नसल्याचे हमी दिली असून, सदर मिळकतीत कोणाचे काही हितसंबंध गुंतलेले असतील किंवा कोणाचाही काही आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसाच्या आत खालील पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रासह संपर्क साधावा.

मुदतीत कोणाचा आक्षेप आला नाही तर, सदर मिळकत निर्वेध, निर्जाखमी, निर्विवाद आहे असे गृहीत धरून, कोणाचाही आक्षेप नाही, असे ग्राह्य धरून जाहीर प्रगटन देणार सदरील मिळकतीबाबत मिळकत मालकयांच्याशी उपरोक्त मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, याची नोंद घ्यावी.

करीता हे जाहीर प्रगटन देण्यात येते.

बीड

दिनांक : ०६/११/२०२५

– जाहीर प्रगटन देणार –
**शेख शहेबाज करीम**
रा. हिंगणी (ह.),ता.जि.बीड

**मार्फत :–**
**ॲड.एस. के. देशमुख,**
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड,
मोबा. ९८२३९६१८८१,
९७६४३९९१९२


## एसटी महामंडळाचे वाहक उत्तम तोटेवाड यांचा सेवापूर्ती गौरव



बीड दि.६ (प्रतिनिधी):-महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बीड आगारातील वाहक उत्तम गंगाराम तोटेवाड हे ३३ वर्षे ५ महिन्याच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. उत्तम तोटेवाड यांच्या सेवापूर्ती सोहळ्या निमित्त त्यांचा सपत्नीक महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने भावपूर्ण निरोप देण्यात आला. यावेळी आगार प्रमुख तिडके एटीएस बनसोडे, आतकरे, आजले, धापसे, रसाळ, पान २ वर

## जरांगे पाटील यांना झेडप्लस सुरक्षा प्रदान करा

### आ.सोळंके यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

माजलगाव, दि. ६ प्रतिनिधी: मराठा संघर्ष योध्दा मनोजदादा जरांगे पाटील यांची सुपारी देवुन हत्या घडवणाऱ्या कटाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करून कायदेशिर कारवाई करावी तसेच जरांगे पाटील यांना राज्यशासनाने झेडप्लस सुरक्षा प्रदान करावी अशी मागणी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांचेकडे पत्राव्दारे दि. ६ नोव्हेंबर २०२५ रोजी केली आहे. दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, मराठा आरक्षण योध्दा मनोजदादा जरांगे पाटील यांची २.५ कोटी रू. ची सुपारी देवुन हत्या घडवण्याचा प्रयतन झाल्याबाबत जालना पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल झाली



असून संशयीत दोन व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले आहे. या संदर्भात वृत्तवाहिन्यानी बातम्या देखिल प्रसिध्द केल्या आहेत. त्यामुळे या घटनेचा तिव्र निषेध व्यक्त करत या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करून दोषींविरूध्द कायदेशीर कारवाई करावी व मराठा संघर्ष योध्दा मनोजदादा पान २ वर

## बहुजन मुक्ती पार्टी बीड नगर परिषदेच्या सर्व जागा लढणार–भीमराव कुटे

बीड दि.०७(प्रतिनिधी):– महाराष्ट्रात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका पैकी बीड नगरपरिषद निवडणूक ही बहुजन मुक्ती पार्टी सर्व जागावर लढणार असून बीड शहरातील पार्श्वभूमी पाहता या ठिकाणी आजपर्यंत दलित मुस्लिम ओबीसी या तिघांचा मतापुरता वापर करून जाती जाती मध्ये वाद निर्माण करून सत्ताधारी सत्ता उपभोगत आले आहेत, तथा या सर्व वंचित घटकांना सत्तेपासून दूर ठेवण्याचे काम सर्व राजकीय पक्षांकडून होत आले आहे. फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचाराचा वारसा जपणारा पक्ष म्हणून तथा दलित ,शोषित , पीडित, वंचित घटकांना न्याय मागणारा नव्हे तर न्याय देणारा बनवण्यासाठी बीड नगर परिषदेच्या सर्व जागा लढवणार असून याकरिता इच्छुक उमेदवारांनी विहित नमुना अर्जा सहित संपर्क क्रमांक– ९५६१५०८३२८ वर किंवा पक्ष कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन बीड जिल्हा प्रमुख भीमराव कुटे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## भारत काळे हे पुन्हा जिल्हा परिषद सदस्य होणार



नेकनूर दि.५(प्रतिनिधी):- नेकनूर सर्कलमध्ये विकासाची ओळख निर्माण करणारे माजी जिल्हा परिषद सदस्य भारत काळे पुन्हा एकदा जिल्हा परिषद निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. रस्ते, स्मशानभूमी, पाण्याच्या योजना आणि विविध सार्वजनिक कामांद्वारे त्यांनी हक्काचा माणूस ही प्रतिमा निर्माण केली असून, या कामांच्या बळावर मतदार त्यांना पुन्हा संधी देतील, असे बोलले जात आहे. गेल्या कार्यकाळात कोट्यवधींची कामे मार्गी लावल्यानंतर उर्वरित विकास कामांचा अनुशेष भरून काढण्यासाठी ते पुन्हा जनता दरबारात जाणार आहेत. मायबाप जनतेच्या आशीर्वादाने सुरु केलेला विकासाचा यज्ञ पूर्ण करणार, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

बीड तालुक्यातील नेकनुर येथील भुमिपुत्र तथा माजी जिल्हा परिषद सदस्य दुसऱ्यांदा नेकनुर जिल्हा पान २ वर


Well Furnished
नवीन 2 BHK
फ्लॅटस् फॅमिलीसाठी
**किरायाने देणे आहे**
24 तास पाण्याची सोय उपलब्ध
अक्षर प्लाझा, शिवकमल हॉस्पिटलच्या बाजुला, जालना रोड, बीड.
Mob.9307092575
15969-14183


## अहिल्यानगर ते खोपटी मुक्कामी बस सुरू केल्याने ग्रामीण प्रवाशांची गैरसोय दूर झाली

पिंपळवंडी दि.६(प्रतिनिधी)- आष्टी आगार प्रमुखांनी मागील काही महिन्यापासून अहिल्यानगर-खोपटी मुक्कामी बस सुरू केल्याने पिंपळवंडी-पांगरी-जाटनांदूर परिसरातील प्रवाशांची मोठी गैरसोय दूर झाली आहे.स्वातंत्र्यानंतर (७८ वर्ष) शिरूर तालुक्यातील खोपटी सारख्या डोंगरभागातील दुर्गम अशा खेड्यात आहिल्यानगर खोपटी ही पहिली बस येऊ लागल्याने आष्टी आगार प्रमुखांचे या परिसरातील प्रवाशी जनतेने आभार मानत अभिनंदन केले होते.खोपटी येथून सकाळी ही बस पिंपळवंडी-अंमळनेर डोईठाण-खिळद-धामणगाव-दौलावड गाव मार्गे अहिल्यानगर येथे सकाळी ९:३० वाजता पोहोचते व सायंकाळी अहिल्यानगर येथून सायंकाळी ४:४५ वाजता निघत असल्याने या भागातील प्रवाशांना अहिल्यानगर येथे लवकर पोहोचता येते व दिवसभर अहिल्यानगर येथील खाजगी, शैक्षणिक व दवाखान्यातील सर्व कामे आटोपून सायंकाळी योग्य वेळी गावी पोहोचता येत असल्याने ग्रामस्थ या बससेवेमुळे समाधानी आहेत.या बसने खोपटी-जाटनांदुर-पिंपळवंडी या भागातील जा-ये करणारे प्रवाशी मोठ्या संख्येने असतात.त्यामुळे आष्टी आगाराला उत्पन्नात निश्चित भर पडली असणार.अहिल्यानगर येथून दुपारी २:१५ वाजता कल्याण-बीड व दुपारी ३:३० वाजता मुंबई पाटोदा या दोन बस निघून आल्यानंतर पिंपळवंडी-खोपटी या भागातील प्रवाशांची खूप गैरसोय होत होती.परंतु,आता दोन्ही बस निघून आल्यानंतर अहिल्यानगर-खोपटी या मुक्कामी बसचा या भागातील प्रवाशांसाठी मोठा आधार मिळाला आहे.